


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २७३ * नांदेड * मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# कृतज्ञता व्यक्त करीत नांदेडकरांची नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## ▶▶ नानांच्या आठवणींना उजाळा ▶▶ नानांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी श्रद्धांजली -मान्यवरांच्या भावना






**नांदेड (प्रतिनिधी)–** अभिनयाच्या पडद्यावर अर्थात 'रील' लाईफमध्ये असंख्य व्यक्तिरेखा जागवणारे आणि पडद्याबाहेर 'रिअल लाईफ' दुःखितांच्या वेदनांशी नाते जोडणारे अभिनेते नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देत नांदेडकरांनी कृतज्ञता व्यक्त केली. दैनिक 'गोदातीर समाचार' कार्यालयात श्रद्धांजली/ कृतज्ञता सभा घेण्यात आली. यावेळी अनेक मान्यवरांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

नानांच्या अभिनयापेक्षा त्यांच्या माणूसपणाचा आणि शेतकरी व समाजासाठी उभ्या केलेल्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार या सभेत अनेकांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे, ही सभा कोणतीही औपचारिकता न ठेवता कृतज्ञतेचे समान व्यासपीठ म्हणून घेण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक संपादक केशव घोणसे पाटील यांनी केले.

सभेला विधानपरिषदेचे आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार हेमंत पाटील, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, संपादक शंतनू डोईफोडे, भाजप महिला आघाडीच्या प्रदेश महामंत्री प्रणिताताई देवरे चिखलीकर, माजी जि.प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर, माजी सनदी अधिकारी तथा अभिनेते अनिल मोरे, शेतकरी संघटनेचे नेते गुणवंत पाटील हंगरगेकर, डॉ. दत्ता मोरे, सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी कपाळे, योग गुरु सिताराम सोनटक्के, विजय येवनकर, उद्योजक मारोती कंठेवाड, विसावा ग्रुपचे बालाजी इबितदार, श्याम वडजे पाटील, सुनील कदम मरळककर, दशरथ कपाटे, सार्थक पाचभाई, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे, गंगाधर सोनकांबळे, सुभाष बल्लेवार, व्यंकट वडजे, संतोष टाक, पंडित पवळे, डॉ. सान्वी जेठवाणी, भाऊसाहेब मोरे, प्राचार्या ज्योतकौर पहाडिया, विजय होकर्णे, संदीप सोनकांबळे, नगरसेवक प्रतिनिधी महेंद्र देमगुंडे, कॉ. गंगाधर गायकवाड, चौधरी, संजय कोठाळे, साहेबराव गजभारे, अशोकराव कांबळे, कवित्रीय रूपाली वागरे, साहित्यिक सोनू दरेगावकर, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, पोलीस निरीक्षक राजेश पुरी, नागेश चौधरी, विश्वंभर पवार, आयुब पठाण, दत्तात्रय कांबळे, कुलदीप नंदुरकर, संतोष कुलकर्णी, डी. एम. पांडागळे, विजय कामिनवार, दीपक महालिंगे, गजानन हिंगमिरे, सुनील सुनपे, गणेश आंबेकर, रवी ढगे, अशोक कुंटूरकर, ॲड. गंगाधर सावळे, सारंग नेरलकर, करणसिंह बैस, नरेंद्र गडप्पा, ज्ञानेश्वर सुनेगावकर, गोधाजी खेडेकर, अमरप्रीतसिंघ जज, डॉ. दिनेश भुतडा, विकास भोसीकर, डॉ. भंडारी, भैय्यासाहेब गोडबोले आदी अनेकांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक संपादक केशव घोणसे पाटील यांनी केले. यावेळी संपादक शंतनू डोईफोडे, प्रणिताताई देवरे चिखलीकर, दिलीप पाटील बेटमोगरेकर, अनिल मोरे, गुणवंत पाटील हंगरगेकर, डॉ. दत्ता मोरे, शिवाजीराव कपाळे, योग गुरु सिताराम सोनटक्के गुरुजी, श्याम पाटील वडजे, बालाजी इबितदार, भाऊसाहेब मोरे, कॉ. गंगाधर गायकवाड, संजय कोठाळे, नागनाथ आयलाने, नागेश चौधरी, विजय होकर्णे, कुलदीप नंदुरकर आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.





प्रास्ताविकात केशव घोणसे पाटील यांनी नानांशी जोडलेल्या कार्याच्या आठवणी सांगताना, 'आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो' या भावनेतून नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांनी २०१५ मध्ये आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी मदतकार्य **(पान ३ वर...)**

# विरोधी पक्षांचा पहिल्यांदाच सुप्रीम कोर्टावर विराट मोर्चा, दिल्ली दणाणली

## राहुल, अखिलेश यादवांसह ११ विरोधी नेत्यांकडून एसआयआर, ज्ञानेश कुमारांविरोधात रिट याचिका



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशामध्ये ज्ञानेश कुमार यांच्या विरोधामध्ये रणकंदन माजला असतानाच सोमवारी इंडिया आघाडीकडून अभूतपूर्व मोर्चा सुप्रीम कोर्टावर काढण्यात आला.

इंडिया आघाडीने सुप्रीम कोर्टावरती मोर्चा काढतानाच सरन्यायाधीश सूर्यकांत यांना भेटीची वेळ मागितली होती, मात्र सूर्यकांत यांनी भेटीची वेळ नाकारली. मोर्चाचे नेतृत्व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलं. या मोर्चामध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून दिल्ली पोलिसांना घामटा फोडणारी नेहा बोरा सुद्धा आंदोलनामध्ये दिसून आली. खासदार प्रियंका गांधी, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह ११ पक्षांकडून सुप्रीम कोर्टामध्ये ज्ञानेश कुमार आणि एसआर विरोधामध्ये रिट याचिका दाखल करण्यात आली. बहुधा देशाच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच असा न भूतो न भविष्यती असा मोर्चा सुप्रीम कोर्टावर धडकला.

या मोर्चामध्ये जवळपास १ किलोमीटरच्या अंतरामध्ये विरोध पक्षानेत्यांनी थोडं अंतर बसमधून, थोडं अंतर पायी तर थोडं अंतर वाहनांमधून पार केलं. काँग्रेसकडून देशभरातील नेत्यांना राजधानीमध्ये बोलावण्यात **(पान ३ वर...)**

### ज्ञानेश कुमार विरोधातील सर्व याचिका मंजूर

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता, मतदार याद्यांमधील त्रुटी आणि स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन प्रक्रियेवरून ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केल्या आहेत. न्यायालयाने या सर्व याचिका एकत्र करून यावर येत्या २७ ऑक्टोबर रोजी सुनावणी घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे.

# एमपीएससीचे अध्यक्ष सक्तीच्या रजेवर

▶ पुण्यातील एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन स्थगित
▶ तुकाराम मुंढे समितीत आले, १४ अतिरिक्त मागण्या मान्य



**पुणे (प्रतिनिधी)–** एमपीएससी पेपरफूटी प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांचा राजीनामा घ्यावा, यासाठी गेल्या ११ दिवसांपासून पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरु होते. अखेर या आंदोलनाला यश आलं आहे. सरकारनं विद्यार्थ्यांच्या सगळ्या ममागण्या मान्य केल्या आहेत. पेपरफुटी प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत एमपीएससी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार हे त्या पदावर असणार नाहीत. सरकारनं भीमनवारांना सक्तीच्या रजेवर पाठवलं आहे. यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित केले आहे.

एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवार यांना आंदोलक विद्यार्थ्यांची समजूत काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. आंदोलन मागे घेण्याबाबत रोहित पवार आग्रही दिसत असताना, विद्यार्थी मात्र एमपीएससी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर ठाम होते. राजीनामा घेतल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका या विद्यार्थ्यांनी घेतल्यामुळे आंदोलनस्थळी पेच निर्माण झाला होता. अखेर चौकशी पूर्ण होईपर्यंत एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर रोहित पवार बोलताना म्हणाले, १०० टक्के एक तर आम्हाला राजीनाम्याची मागणी होती. पण राजीनाम्याच्या पाठीमागे शेवटपर्यंत आम्ही राहिलो असतो, तर कदाचित आम्हाला यश मिळालं असतं, पण बरेच बरेच दिवस आणि बरेच महिने गेले असते आणि त्यात आम्हाला भीती वाटते विद्यार्थ्यांच्या भविष्याची, त्यांच्या परीक्षा, त्यांचा अभ्यास. मग आम्ही सरकारवर दबाव ठेवला, विद्यार्थ्यांची एकजूट होती, विद्यार्थ्यांची जी समिती (कमिटी) होती, त्यांनी तो लढा लढला आणि मग याच्यामध्ये डबल फायदा झाला. एक तर आपल्याला जागा वाढवून मिळाल्या, इतर मागण्या ज्या होणार नव्हत्या, त्या आपल्याला मान्य करून मिळाल्या. आणि त्याच्या दुसऱ्या बाजूला, तुकाराम मुंडे यावेत अशी या सगळ्यांची इच्छा होती. एमपीएससीच्या शुद्धीकरणासाठी एक कमिटी स्थापन करणं ही मागणी होती.

# आंदोलनस्थळातून जंतर मंतर हद्दपार, केंद्रीय गृह मंत्रालयाचा निर्णय

**नव दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्लीतील जंतर मंतर येथे आता आंदोलनांना परवानगी दिली जाणार नाही. केंद्र सरकारने हे ठिकाण आंदोलनासाठी निश्चित केलेल्या स्थळांच्या यादीतून काढून टाकले आहे. गृह मंत्रालयाने एक समिती स्थापन केली होती. समितीच्या शिफारशीनुसार, दिल्लीतील रामलीला मैदान, बुराडी ग्राउंड आणि पूर्व दिल्लीतील सीबीडी ग्राउंड ही आंदोलनाची ठिकाणे म्हणून निश्चित करण्यात आली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईसी) ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची आणि एसआयआरवर बंदी घालण्याची मागणी करत कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) जंतर मंतर येथे आंदोलन करण्याची परवानगी मागितली होती. दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली. यापूर्वी, नीट पेपरफुटी प्रकरणी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने २० जून ते २५ जुलै दरम्यान आंदोलन केले होते.

# गोंडजेवली तांड्यात ट्रॅक्टर जळून खाक; सुदैवाने जीवितहानी टळली

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील गोंडजेवली तांडा येथे रविवारी सोयाबीन काढणीचे काम सुरू असताना ट्रॅक्टरने अचानक पेट घेतल्याने ट्रॅक्टर जळून खाक झाले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

गोंडजेवली तांडा येथे रविवारी ट्रॅक्टरला मळणी यंत्र जोडून सोयाबीन काढण्याचे काम सुरू होते. यावेळी उष्णतेमुळे इंजिन मोठ्या प्रमाणावर तापल्याने ट्रॅक्टरने अचानक पेट घेतला. आगीने रौद्ररूप धारण केल्याने ट्रॅक्टर जळून खाक झाले. या घटनेत ट्रॅक्टरसह सोयाबीनचेही नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही घटना मोठा धक्का ठरली आहे. या आगीमुळे ट्रॅक्टर मालक सरीचंद रामा राठोड यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे.

या घटनेची संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन घटनास्थळाची पाहणी करावी, नुकसानीचा पंचनामा करावा आणि शासनाच्या नियमानुसार नुकसानग्रस्त ट्रॅक्टर मालक व शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.






# आज पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा नांदेडच्या नागरिकांशी संवाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे आज मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या कामकाजाचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय येथे उपस्थित राहणार आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांनी नागरिकांच्या तक्रारी व समस्या थेट ऐकूण घेण्यासाठी दुपारी ३ ते ५ हा वेळ राखीव ठेवला आहे.

जिल्ह्यातील ज्या नागरिकांच्या पोलीस विभागाशी संबंधित तक्रारी किंवा समस्या असतील, त्यांनी या वेळेत पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड येथे उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# घरात अवैध गुटख्याचा साठा; गुटखा जप्त, गुन्हा दाखल

## इतवारा गुन्हे शोध पथकाची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत इतवारा पोलिसांनी देगलूर नाका परिसरात छापा टाकून १ लाख ६ हजार २८४ रुपयांचा प्रतिबंधित मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ११ ऑक्टोबर रोजी इतवारा पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध पथक प्रमुख जळबा गायकवाड हे आपल्या पथकासह पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, देगलूर नाका भागातील सिटीझन गल्ली, तुराबनगर येथे एका इसमाने घरात विक्रीच्या उद्देशाने प्रतिबंधित गुटखा साठवून ठेवला आहे.

खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष सायंकाळच्या सुमारास छापा टाकला असता, साजीद खान इनायत खान (वय ३५, रा. शहीद टिपू सुलतान रोड, इस्लामपूरा, सध्या रा. सिटीझन गल्ली, तुराबनगर, देगलूर नाका, नांदेड) हा व्यक्ती आढळून आला. घराची झडती घेतली असता पांढऱ्या पोत्यांमध्ये कॅन्सरसारख्या गंभीर आजारास कारणीभूत ठरणारा प्रतिबंधित गुटखा, सुगंधी तंबाखू व पानमसाल्याचा मोठा साठा आढळून आला.

या कारवाईत विमल पानमसाला, सागर पानमसाला, एसआर-१ सुगंधी तंबाखू, मुसाफिर पानमसाला अशा विविध कंपन्यांचा एकूण १ लाख ६ हजार २८४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध इतवारा पोलीस ठाणे गु.र.नं. ३३६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७४, २७५ सह अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम कलम २६, २७, ३०(२) (५९) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर कैलासे, गुन्हे शोध पथकाचे पोउपनि जळबाजी गायकवाड, अंमलदार बंडू कलंदर, बालाजी हिंगणकर, शेख इस्राईल आणि महिला अंमलदार शबाना यांच्या पथकाने पार पाडली.

जिल्ह्यात अवैध गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूची वाहतूक, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# अरविंद केजरीवाल यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** आम आदमी पार्टीचे प्रमुख तथा दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणीत पुन्हा एकदा वाढ झाली आहे. दिल्लीतील बंगला साहिब गुरुद्वारात कथित गोंधळ घातल्याचा आणि घोषणाबाजी केल्याच्या आरोपाप्रकरणी अरविंद केजरीवाल यांच्यासह आम आदमी पार्टीच्या काही कार्यकर्त्यांवर एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात विरोधकांकडून देशभरात आंदोलन करण्यात येत आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधक करत आहेत. या आंदोलनात केजरीवाल यांचा सहभाग होता.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# धरणांची सुरक्षा कोण करणार?

महाराष्ट्राची ओळख धरणांच्या राज्यांपैकी एक म्हणून केली जाते. पिण्याचे पाणी, शेतीचे सिंचन, उद्योगांची गरज आणि शहरांची तहान भागविण्यात धरणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र, हजारो कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या जलसाठ्यांच्या सुरक्षिततेकडे आपण किती गांभीर्याने पाहतो, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. राज्यातील जलसंपदा विभागाच्या तब्बल ५ हजार ४१० सिंचन धरणांचे थर्ड पार्टी स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा शासनाचा निर्णय त्यामुळे स्वागतार्ह असला, तरी तो केवळ कागदोपत्री न राहणे ही खरी कसोटी आहे. धरण म्हणजे केवळ पाण्याचा साठा नव्हे; ते लाखो नागरिकांच्या जीवनाचे संरक्षण करणारे अभेद्य कवच असते. धरणाच्या भिंतीत, पाळीत किंवा सांडव्यात निर्माण झालेली छोटीशी त्रुटीही भविष्यात मोठ्या आपत्तीचे कारण ठरू शकते. धरण फुटल्यास काही तासांतच गावांचे, शेतांचे आणि मानवी वस्त्यांचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. त्यामुळे धरणांच्या सुरक्षिततेबाबत 'दुरुस्तीची वेळ आली की पाहू' अशी मानसिकता परवडणारी नाही. स्ट्रक्चरल ऑडिटची गरज स्पष्ट करणारी अनेक लक्षणे आज राज्यातील धरणांवर दिसतात. धरणांच्या पाळीवर आणि भिंतीवर झाडे उगवणे, सांडव्यांची झीज होणे, पिचिंग खराब होणे, भराव वाहून जाणे अशा बाबी धरणांच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा आहेत. या सगळ्या बाबींमध्ये भर पडते ती धरणाला लागलेली भ्रष्टाचाराची वाळवी. या त्रुटी वेळेत दूर न केल्यास त्यांची तीव्रता वाढत जाते. स्थानिक अधिकारी दुरुस्तीची शिफारस करतात; मात्र निधीअभावी अनेकदा कामे रखडतात. धरण वाचविण्यासाठी खर्च करणे महाग वाटते; पण धरण फुटल्यानंतर होणारी आर्थिक आणि जीवितहानी त्यापेक्षा कितीतरी पटीने महाग असते, हे प्रशासनाने लक्षात घ्यायला हवे. बदलते हवामान या संकटाची तीव्रता आणखी वाढवत आहे. कधी अल्पावधीत विक्रमी अतिवृष्टी, तर कधी दीर्घकाळ दुष्काळ, अशी टोकाची परिस्थिती निर्माण होत आहे. अतिवृष्टीच्या काळात धरणांवर पाण्याचा प्रचंड दबाव येतो. अशावेळी सांडव्यांची क्षमता, भिंतींची मजबुती, पाळीची स्थिरता आणि जलनियंत्रण यंत्रणा यांची कसोटी लागते. त्यामुळे जुन्या धरणांकडे केवळ त्यांच्या वयाच्या आधारावर नव्हे, तर बदललेल्या हवामानाच्या पार्श्वभूमीवरही पाहणे आवश्यक आहे. थर्ड पार्टी ऑडिटचे महत्त्व येथे अधोरेखित होते. एखाद्या यंत्रणेने स्वतःच्या कामाचे परीक्षण करण्यापेक्षा स्वतंत्र तज्ज्ञांकडून तपासणी झाल्यास त्रुटी अधिक वस्तुनिष्ठपणे समोर येऊ शकतात. एका मंडळातील पाच अभियंत्यांचे पथक दुसऱ्या जिल्ह्यात पाठविण्याची पद्धतही पारदर्शकता आणि स्वतंत्र मूल्यांकनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकते. मात्र, ऑडिटचा अहवाल तयार होणे ही प्रक्रिया पूर्ण झाल्याचे लक्षण नाही; त्या अहवालातील प्रत्येक गंभीर शिफारशीवर वेळेत कार्यवाही होणे हेच खरे यश आहे. राज्यातील सर्वच धरणांचे ऑडिट म्हणजे प्रचंड मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येक धरणासाठी 'जोखीम नकाशा' तयार करणे आवश्यक आहे. कोणते धरण तातडीने दुरुस्तीच्या गरजेचे आहे, कोणत्या धरणाची नियमित देखभाल पुरेशी आहे आणि कोणत्या धरणावर दीर्घकालीन पुनर्बांधणीची गरज आहे, याचे वर्गीकरण झाले पाहिजे. केवळ अहवालांच्या फाइल्स तयार करून धरणांची सुरक्षा सुनिश्चित होणार नाही. यासाठी स्वतंत्र आणि पुरेसा धरण सुरक्षा निधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. देखभाल-दुरुस्तीचा निधी हा विकासकामांच्या उरलेल्या पैशातून देण्याची बाब मानता कामा नये. कारण धरणांची सुरक्षा ही विकासापेक्षाही अधिक मूलभूत बाब आहे. शिवाय आधुनिक सेन्सर्स, पाणीपातळी व गळती निरीक्षण यंत्रणा, ड्रोन सर्वेक्षण आणि डिजिटल मॉनिटरिंग यांचा व्यापक वापर केला पाहिजे. शक्य असल्यास उपग्रहाच्या माध्यमातून त्याचे सर्वेक्षण केले गेले पाहिजे. आज राज्यातील अनेक धरणे जुनी आहेत. त्यांची निर्मिती ज्या काळात झाली, त्या काळातील पर्जन्यमान, लोकसंख्या, बांधकाम तंत्रज्ञान आणि हवामानाची परिस्थिती आज राहिलेली नाही. त्यामुळे 'धरण बांधले आणि काम संपले' हा दृष्टिकोन बदलण्याची वेळ आली आहे. धरण बांधणे हा प्रकल्पाचा पहिला टप्पा आहे; त्याची सुरक्षित देखभाल ही पुढील अनेक दशकांची जबाबदारी आहे. शासनाने घेतलेला स्ट्रक्चरल ऑडिटचा निर्णय ही त्यामुळे चांगली सुरुवात आहे. पण खरी परीक्षा पावसाळ्यातील एखाद्या दुर्घटनेनंतर होऊ नये. धरण फुटल्यानंतर पंचनामे, मदत आणि चौकशी समित्या नेमून कागदी घोडे नाचविण्यापेक्षा धरण फुटू नये म्हणून आजच पैसा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ खर्च करणे अधिक शहाणपणाचे आहे. हजारो धरणांमध्ये दडलेला संभाव्य धोका शोधून त्यावर वेळीच उपाय केला, तरच हे ऑडिट खऱ्या अर्थाने 'जलसुरक्षेचे कवच' ठरेल.

# शाळा म्हणजे व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी कार्यशाळा

शाळा म्हणजे केवळ ज्ञान देण्याचे केंद्र नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी कार्यशाळा होय. येथे विद्यार्थी पुस्तकी ज्ञानासोबत सहजीवन, जबाबदारी, आत्मसंयम, परस्पर आदर आणि योग्य-अयोग्य यांतील फरक शिकत असतात. या प्रक्रियेत शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त निर्माण करताना त्यांना शिक्षा करावी का, हा प्रश्न आज अनेक शिक्षकांसमोर उभा आहे. वर्गात गोंधळ घालणारे विद्यार्थी, वारंवार सूचना देऊनही न ऐकणारी मुले, गृहपाठ न करणारे विद्यार्थी, एकमेकांची चेष्टा करणारे किंवा शिक्षकांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणारे विद्यार्थी, ही परिस्थिती अनेक शिक्षकांसाठी आव्हानात्मक ठरते. अशा वेळी रागावणे, कठोर शब्द वापरणे किंवा शिक्षा करणे हा सोपा मार्ग वाटू शकतो. परंतु, या मार्गाने विद्यार्थ्यांच्या वर्तनात खरोखरच सकारात्मक बदल घडतो का? की केवळ शिक्षकांसमोर शांत राहण्याची सवय निर्माण होते?



आजच्या शिक्षणव्यवस्थेला या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. कारण शिस्त लावणे आणि शिस्त घडवणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. पहिल्या प्रक्रियेत बाह्य दबाव महत्त्वाचा असतो, तर दुसऱ्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या मनात योग्य वर्तनाची जाणीव निर्माण केली जाते. शिस्त म्हणजे शिक्षक वर्गात आले की शांत बसणे आणि शिक्षक बाहेर गेले की गोंधळ घालणे नव्हे. शिक्षकांच्या अनुपस्थितीतही नियमांचे पालन करणे, स्वतःच्या कृतींची जबाबदारी स्वीकारणे आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करणे, ही खऱ्या शिस्तीची लक्षणे आहेत. भीतीमुळे विद्यार्थी काही काळ आज्ञाधारक राहू शकतो; मात्र त्यातून आत्मनियंत्रण विकसित होईलच असे नाही. सतत शिक्षा होण्याची भीती असलेल्या विद्यार्थ्याला आपली चूक मान्य करण्याऐवजी ती लपवावीशी वाटू शकते. याउलट, शिक्षकांशी विश्वासाचे नाते असलेला विद्यार्थी आपली अडचण सांगण्यास आणि चूक सुधारण्यास अधिक तयार होतो. म्हणूनच शिस्तीचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना नियंत्रणात ठेवणे नसून, त्यांना स्वतःवर नियंत्रण ठेवायला शिकवणे हे असले पाहिजे.

एखादा विद्यार्थी वारंवार वर्गात बोलतो, अभ्यासात लक्ष देत नाही किंवा इतरांना त्रास देतो, तेव्हा त्याला लगेच बेशिस्त ठरवणे योग्य नाही. त्याच्या वर्तनामागे कोणते कारण आहे, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे. कदाचित त्याला शिकवलेला विषय समजत नसेल, घरात काही तणाव असेल, त्याला पुरेसे भावनिक पाठबळ मिळत नसेल किंवा स्वतःकडे लक्ष वेधून घेण्यासाठी तो असे वागत असेल. काही वेळा विद्यार्थ्यांना आपल्या भावना योग्य शब्दांत व्यक्त करता येत नाहीत आणि त्याचा परिणाम त्यांच्या वर्तनातून दिसून येतो. अशा प्रसंगी संपूर्ण वर्गासमोर विद्यार्थ्याला सुनावण्याऐवजी त्याच्याशी एकांतात संवाद साधावा. त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे आणि समस्या सोडविण्यासाठी त्याला सहभागी करून घ्यावे. प्रत्येक चुकीचे समर्थन करणे आवश्यक नाही; मात्र, चूक करणाऱ्या विद्यार्थ्याला समजून घेणे आवश्यक आहे. वर्गातील शिस्त टिकवण्यासाठी नियम आवश्यक आहेत. परंतु हे नियम केवळ शिक्षकांनी सांगितलेले आदेश न राहता विद्यार्थ्यांनी स्वीकारलेली सामूहिक जबाबदारी बनली पाहिजेत. वर्गाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांशी चर्चा करून एकमेकांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकणे, अपमानास्पद भाषा न वापरणे, वर्ग स्वच्छ ठेवणे, वेळेचे पालन करणे आणि स्वतःच्या कृतींची जबाबदारी स्वीकारणे, असे काही मूलभूत नियम ठरवता येतील. विद्यार्थ्यांना नियम का आवश्यक आहेत, त्यांचे उल्लंघन झाल्यास इतरांवर काय परिणाम होतात आणि प्रत्येकाने कोणती जबाबदारी पार पाडली पाहिजे, हे समजावून सांगावे. नियम स्पष्ट, मर्यादित आणि सर्वांसाठी समान असतील, तर त्यांचे पालन करणे सोपे जाते.

चूक झाल्यावर विद्यार्थ्याला त्रास देणे आणि त्या चुकीची जाणीव करून देणे यात मूलभूत फरक आहे. शिक्षेमुळे विद्यार्थ्याला आपल्यावर अन्याय झाला असे वाटू शकते; पण योग्य परिणामांमुळे त्याला आपल्या कृतीची जबाबदारी समजण्यास मदत होते. उदाहरणार्थ, एखाद्या विद्यार्थ्याने वर्गात कचरा टाकला, तर त्याला अपमानित करण्याऐवजी तो कचरा योग्य ठिकाणी टाकण्यास सांगावे. एखाद्याने मित्राचे साहित्य खराब केले, तर नुकसान भरून काढण्यासाठी त्याने काय करावे, यावर चर्चा करावी. एखाद्या विद्यार्थ्याने दुसऱ्याला दुखावले असेल, तर त्या कृतीचा परिणाम समजावून सांगून परिस्थिती सुधारण्यास मदत करावी. अशा पद्धतीचा उद्देश विद्यार्थ्याला अपराधी ठरवणे नसून, चूक आेळखणे, तिचे परिणाम समजणे आणि सुधारणा करणे हा असतो. मात्र, या प्रक्रियेत अपमान, धमकी किंवा जबरदस्तीला स्थान असू नये. शिक्षकांचे लक्ष अनेकदा विद्यार्थ्यांच्या चुकांकडे अधिक जाते. मात्र, योग्य वर्तनाची दखल घेतली तर विद्यार्थ्यांना ते वर्तन पुन्हा करण्यासाठी प्रोत्साहन मिळते. वेळेवर काम पूर्ण करणे, मित्राला मदत करणे, शांतपणे आपली बाजू मांडणे, स्वतःची चूक मान्य करणे किंवा वर्गाची जबाबदारी मनापासून पार पाडणे, अशा कृतींचे मनापासून कौतुक करावे. आज तू मित्राचे म्हणणे शांतपणे ऐकलेस, हे चांगले केलेस, किंवा तू स्वतःची चूक मान्य केलीस, यासाठी तुझे कौतुक, अशा शब्दांतून विद्यार्थ्याला त्याच्या वर्तनाचे महत्त्व समजते. प्रत्येक वेळी बक्षीस देण्याची गरज नसते. शिक्षकांचे प्रामाणिक कौतुक, विश्वासाने दिलेली जबाबदारी आणि प्रगतीची दखल हेही प्रभावी प्रेरणास्रोत ठरतात. मात्र, विद्यार्थ्यांची परस्पर तुलना करण्याऐवजी प्रत्येकाच्या वैयक्तिक प्रगतीवर भर द्यावा.

अधिकाराचा वापर आवश्यक असला, तरी त्याला न्याय, संवेदनशीलता आणि विश्वासाची जोड मिळाली पाहिजे. काही वेळा वर्गातील बेशिस्तपणामागे कंटाळा, निष्क्रियता किंवा शिकण्यात रस न वाटणे ही कारणे असू शकतात. सतत ऐकत बसण्यापेक्षा विद्यार्थ्यांना कृतीतून शिकण्याची संधी मिळाली, तर त्यांचा सहभाग वाढतो. गटचर्चा, शैक्षणिक खेळ, प्रश्नमंजुषा, प्रकल्प, भूमिकानाट्य आणि सहकार्याने पूर्ण करायची कामे यांचा वापर करता येतो. वर्गाची स्वच्छता, पुस्तकांचे व्यवस्थापन आणि शैक्षणिक साहित्याची काळजी अशा जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांना दिल्यास त्यांच्यात मालकीची भावना निर्माण होते. प्रत्येक विद्यार्थ्याचे वय, क्षमता आणि गरजा वेगळ्या असतात. त्यामुळे सर्वांना एकाच पद्धतीने हाताळण्याऐवजी परिस्थितीनुसार अध्यापन आणि शिस्तीच्या पद्धतींमध्ये बदल करणे आवश्यक आहे. ज्या वर्गात प्रश्न विचारल्यावर हसले जाते, चुका झाल्यावर अपमान केला जातो किंवा प्रत्येक वेळी ओरडण्याचा अनुभव येतो, त्या वर्गात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. अशा वातावरणात ते चुका लपवण्याचा किंवा सहभाग टाळण्याचा प्रयत्न करतात. याउलट, प्रत्येक विद्यार्थ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी मिळणारा आणि मतभेदांचा आदर केला जाणारा वर्ग अधिक सकारात्मक ठरतो. शिक्षकांनी शांततेसाठी पूर्वनिश्चित संकेत वापरावेत, सूचना स्पष्ट द्याव्यात आणि वर्गात काय अपेक्षित आहे, याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. शिस्तीतील सातत्यही तितकेच महत्त्वाचे आहे. एकाच चुकीकडे एका विद्यार्थ्याच्या बाबतीत दुर्लक्ष करणे आणि दुसऱ्याला कठोर शिक्षा देणे, यामुळे अन्यायाची भावना निर्माण होते. नियमांची अंमलबजावणी न्याय्य, सुसंगत आणि विद्यार्थ्यांच्या प्रतिष्ठेचा आदर करणारी असावी.

विद्यार्थ्यांच्या वर्तनाची जबाबदारी केवळ शाळेची किंवा शिक्षकांची नसते. घरातील वातावरण, पालकांचे वर्तन, मित्रपरिवार आणि सामाजिक परिस्थिती यांचाही मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. एखाद्या विद्यार्थ्याच्या वर्तनात वारंवार अडचणी दिसत असल्यास पालकांशी संवाद साधावा. केवळ तक्रार करण्याऐवजी विद्यार्थ्याच्या चांगल्या गुणांचा उल्लेख करून त्याच्या सुधारणेसाठी संयुक्त प्रयत्न करावेत. गरजेनुसार मुख्याध्यापक, समुपदेशक किंवा संबंधित तज्ज्ञांची मदत घ्यावी. शारीरिक शिक्षा, धमकी, अपमान आणि मानसिक छळ यांना शिस्तीची साधने मानता कामा नये. भारतातील बालकांच्या शिक्षणाच्या हक्कासंबंधी कायद्यात शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळास प्रतिबंध आहे. गंभीर किंवा वारंवार घडणाऱ्या घटनांकडे दुर्लक्ष न करता शाळेच्या नियमानुसार योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे.

शिक्षा काही वेळा तात्पुरती शांतता निर्माण करू शकते; परंतु संवाद, विश्वास, सकारात्मक प्रोत्साहन, स्पष्ट मर्यादा आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन यांच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या वर्तनात अधिक टिकाऊ बदल घडवता येतात. प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो. त्यामुळे त्याला समजून घेण्यासाठी संयम, संवेदनशीलता आणि योग्य दृष्टिकोन आवश्यक असतो. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. त्याच्या एका प्रेमळ शब्दातून आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो, एका योग्य कृतीतून जबाबदारीची जाणीव होऊ शकते आणि एका समजूतदार संवादातून विद्यार्थ्याच्या वर्तनाला नवी दिशा मिळू शकते. खरी शिस्त तीच, जी शिक्षक समोर नसतानाही टिकून राहते. खरे शिक्षण तेच, जे विद्यार्थ्याला स्वतःची चूक ओळखून ती सुधारण्याची प्रेरणा देते. चला, आपण अशी शाळा घडवूया जिथे शिस्त असेल, पण दहशत नसेल; नियम असतील, पण अन्याय नसेल; शिक्षकांचा अधिकार असेल, पण विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानाशी तडजोड नसेल. कारण त्यांना समजून घेऊन स्वतःहून शिस्त पाळणारे बनवणे, हेच खऱ्या शिक्षकत्वाचे कसब आहे.

**– नासा येवतीकर,**
धर्माबाद, जि. नांदेड

# तरुणाई प्रवाही पाण्यासारखी असावी



माध्यमिक शिक्षण घेत असताना साने गुरुजींच्या साहित्याचे वाचन हा माझ्यासारख्या विद्यार्थ्यांचा श्वास होता. त्यांच्या पुस्तकवाचनातून नेहमीच एक वेगळ्या भावविश्वाशी तादात्म्य पावण्याचा स्वानुभव मिळत होता. त्या एकरूपतेतून दूर करण्याचा दुष्टपणा कोणी केला तर त्या बालविश्वातील साधना त्या व्यक्तीने भंग केल्याचे दुःख पदरी पडायचे, का असा दुष्टपणा केला असेल या व्यक्तीने,असा मनोमन सात्विक संताप येऊन जायचा. त्यावेळेस शक्यतोवर असे जोरात ओरडून आवाज देण्याचे सत्कार्य आई, वडीलच करायचे. मग एक नामी युक्ती मला सुचत असे, पण ती युक्ती फक्त आईसमोरच चालायची. वडिलासमोर त्या युक्तीच्या संदर्भाने एक अवाक्षरही काढता येत नसे. ती युक्ती अशी, अगं आई हे पुस्तक किती सुंदर आहे बघ, मी तुला वाचून दाखवतो.तू काम करता करता ऐक. तू जर ऐकलेस तर मी तुला तुझ्या कामात मदत करेन, ती तयार व्हायची. ऐकल्यावर म्हणायची, किती चांगले विचार आहेत रे वसंता, हे सगळं ऐकण्यासारखंच आहे बाप्पा,असं काही काही मले बी वाचून दाखवजो, म्हणजे माह्या डोसक्यात जराकसा उजेड पडल! ती अशी म्हणाली की माझा उत्साह वाढायचा. माझे वाचणे सुरू झाले की शेजारच्या दोनचार घरी ऐकू जायचे.शेजारच्या माउल्यांना माझा हेवा वाटायचा, आपला मुलगा आपल्याला असे काही वाचून दाखवत नाही म्हणून त्यांच्या मुलावर यथायोग्य शाब्दिक प्रहार व माझ्यावर कौतुकाचा वर्षाव हे अगदी ठरलेले हो त्या वेळी साने गुरुजींची एक छोटीशी पुस्तिका, 'देवाघरच्या फुलांनो' असाच एकदा आईला वाचून दाखवत होतो. त्यातील एक गोष्ट अशी, एकदा एका लहान मुलास एक संगीत शिक्षक तबला वादनाचा सराव करून घेत होते. त्याच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळेपर्यंत गुरुजींचा सराव करून घेणे सुरूच होते. साहजिकच काही कालावधीने तो मुलगा कंटाळला आणि सहजपणे बोलून गेला, अहो गुरुजी काय त्रास आहे हो हा, अजून किती वेळ हे सगळे चालू राहणार आहे, माझी बोटे खूप दुखत आहेत हो. त्यावर गुरुजी हसत म्हणाले, बघ कंटाळा करू नकोस, सरावामुळे तुझी बोटे खूप बळकट होतील. दुःख, त्रास, यातना, कष्ट, श्रम याशिवाय शारीरिक व मानसिक क्षमता वाढत नाहीत, जेंव्हा अतिश्रमामुळे अंगातून घाम निथळेल, तेंव्हा मनाला मिळणारा आनंद सुखशैय्या घेणाऱ्या कोट्यधीशापेक्षाही आपल्या चेहऱ्यावर जास्त असेल. रक्ताभिसरण, हृद्यस्पंदने, मेंदूची सक्रियता मोठ्या प्रमाणात वाढलेली असेल. तेंव्हा आपली सक्रियताही वाढलेली असेल. युवापिढीच्या जीवनातील आनंद व कार्यक्षमता वाढविण्यासाठी युवकांनी अनंत परिश्रम करण्याची तयारी दाखविली पाहिजे.

गुरुजींच्या या समर्पक उत्तरामुळे विद्यार्थ्यांचे समाधान झाले. कठोर परिश्रमाला पर्याय नाही हे विद्यार्थ्यांनी मनोमन जाणले. दुःखाशिवाय बळ नाही. श्रमाशिवाय सामर्थ्य नाही. सर्व महापुरुषांच्या जीवनात अनंत दुःख आहेत, यातना आहेत. त्यांच्या जीवनप्रवासात त्यांना मानसिक, शारीरिक व बौद्धिक बळ कोणी दिले? दगडातील अनावश्यक भाग काढून टाकण्यासाठी त्या दगडाला जे घाव सहन करावे लागतात.

एकदा हिमालयाच्या कुशीतून निघालेले दोन प्रवाह खळाळत निघाले. एक प्रवाह म्हणाला, आता कुठपर्यंत धावत निघायचे आहे. या डोंगराजवळ मी थांबलो तरी माझा उपयोग होईलच. जेंव्हा लोक जंगलात येतील, प्राणी, पक्षी येतील तेंव्हा त्यांची तृष्णा भागविण्याचे काम मी करेल. सत्कार्य काय एका ठिकाणी राहूनही करता येते. इथेच थांबल्यामुळे माझ्या आजूबाजूला अनेक सुविधाही होतील. लोक एक पर्यटनस्थळ म्हणून माझा उपयोग करतील.अनेक लोक आनंद घेतील. मी अनेकांच्या वाट्याला येईल.एका जाग्यावर थांबूनही आनंदाचा स्वामी मला होता येईल .त्या प्रवाहाचा विचार पक्का झाला.त्याने तिथेच कायमस्वरूपी थांबा घेतला.

आपले डबके होईल.याची किती उत्तम काळजी घेते ती जलसरिता. आता तिच्या प्रवाह तीरावर मोठे वृक्षही आहेत.किती हिरवीगार शेते,शेतात राबणारे शेतकरी, कष्टकरी, सर्व काही आनंदमय वातावरण. मासे, कासव आणखी छोटे मोठे जलचर प्राणी. या पाण्याचा उपयोग नवनवीन उद्योग धंद्यासाठी होतो आहे. ती नदी पुढेच जात आहे. आता तिला सागर मिलनाची उत्कंठा लागली आहे. समुद्रमार्गातील ये जा आता त्या नदीतून सुरू झाली आहे. किती भाग्य त्या जलप्रवाहाचे.

जो प्रवाह एकाच ठिकाणी जंगलात डोंगराच्या बाजूने थांबला होता. त्या साचलेल्या पाण्यापर्यंत एक वाटसरू वाट चुकून तिथपर्यंत पोहचला.त्याला खूप तहान लागलेली होती. तो वाटसरू पाणी पिण्यासाठी त्या पाण्याजवळ गेला. त्याने हाताची ओंजळ केली तर त्याच्या हातात नुसते शेवाळ आले. एका प्रवाशाची तहान भागविण्याचे सौभाग्य त्या साचलेल्या प्रवाहाला मिळू शकले नाही.

मनुष्य जीवन हे पाण्यासारखे प्रवाही असावे. त्याने अनेकांच्या वाट्याला यावे. त्यातही मनुष्य जीवनातील युवावस्था, एका अर्थाने खळाळून वाहणारा प्रवाहच. उसळते साहस घेवून दैनंदिन मार्गक्रमण करणारा, सदोदित प्रसन्न असणारा, नवचैतन्य घेऊन जगणारा, यश मिळविण्यासाठी शॉर्टकट स्वीकारण्याऐवजी आजन्म विद्यार्थीच राहील, असा मनोनिश्चय करून सतत शिकत राहणारा, सदैव नाविन्याचा ध्यास घेणारा, आपल्या जवळील जे देण्यासारखे आहे ते इतरांना मुक्तहस्ताने देणारा, दातृत्वभाव लक्षात ठेवून सतत सेवाभाव जपणारा, वरिष्ठांचा सन्मान ठेवून समर्पित जीवन जगणारा, अशाप्रकारे सर्व सद्गुण अंगी बाळगत गेलात तर इतरांना सुखाची पाखरण करीत जी नदी सागरास जाऊन मिळाली. त्याप्रमाणे तुमची तरुणाई सर्व समाज व राष्ट्रास आपल्या मनुष्य जन्माने आनंदी करू शकेल. शेवटी सत्कार्य सागरास जाऊन आपण एकरूप व्हाल. त्यामुळे त्या एकलकोंड्या प्रवाहाप्रमाणे निष्क्रिय होऊ नका. ते जगणे म्हणजे मरणयातना होय. प्रवाही माणसांचे मरण अनेक अर्थाने जगणे असते. आपले जगणे कधीही मरणयातना होता कामा नये. तसे झाल्यास आपण आपल्यातील मनुष्यत्वाचा विकास करू शकलो नाही याची साक्ष देणेच होय. अशा माझ्या वाचनामुळे आई खूप आनंदी व्हायची. तिला शिक्षणाचा गंध नसला तरी आपण नवीन काही ऐकले आणि ते माझ्या मुलाने मला वाचून दाखविले याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर भरभरून दिसायचा. पुढे माझ्या नौकरीच्या गावी मेहकरला आई माझ्यासोबतच होती आणि चांगलं काही वाचून दाखव! हा तिचा हट्ट कायम होता.तिचा हट्ट पूर्ण करण्यात मलाही भरभरून आनंद मिळत होता. ते माझे परमभाग्य होते.

**–प्रा वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो.९०११२२९२३२

# दुर्गा महोत्सवानिमित्त
## (कर्तृत्ववान महिला विशेष)
### इंजिनिअर ते सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट; हर्षदा सूर्यवंशीचा संघर्षातून यशाकडे झेपावणारा प्रवास



दुर्गा महोत्सव हा स्त्री शक्तीचा, जिद्द आणि कर्तृत्वाचा उत्सव आहे. या उत्सवाचे औचित्य साधून आज अशाच एका जिद्दी दुर्गेची यशोगाथा.

अभियांत्रिकीचे शिक्षण सोडून एक उत्कृष्ट मेकअप आर्टिस्ट बनण्यापर्यंतचा प्रवास सोपा नसतो. भरपूर अडचणींचा सामना करून जेव्हा एखादी मुलगी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी मेहनत घेते, तेव्हा ती मेहनत समाजातील अनेक मुलींसाठी प्रेरणा बनते.

**लाइफ टर्निंग पॉईंट** –इंजिनिअर म्हणून घेतलेले शिक्षण आणि मेकअप आर्टिस्ट या दोन्ही बाजू परस्परविरोधी आहेत. इंजिनिअरिंग म्हणजे स्थिर करिअर आणि चांगली नोकरीची खात्री, पण जेव्हा आवड ही कोडिंग किंवा मशीनऐवजी रंग, सौंदर्य आणि कलेमध्ये असते, तेव्हा एक वेगळाच संघर्ष सुरू होतो.

याच संघर्षातून नांदेडच्या हर्षदा सूर्यवंशी यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज जिल्ह्यातील नामांकित सेलिब्रिटींच्या मेकअपची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली जाते, ही त्यांच्यासाठी सुवर्णसंधी ठरली आहे.

एवढेच नव्हे तर ग्रामीण भागातील अनेक मुलींना ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वबळावर उभे करण्याचे महान कार्यही त्या करीत आहेत. त्यांच्यामुळे ग्रामीण भागातील महिला आज स्वतःच्या पायावर उभ्या राहून सेवा देत आहेत. बाहेरून हा प्रवास जितका ग्लॅमरस, रंगबेरंगी आणि आकर्षक दिसतो, आतून तितकाच तो कठोर परिश्रम, संघर्ष आणि समर्पणाने भरलेला आहे. हा प्रवास फक्त चेहऱ्यावर रंग बदलण्यापुरता मर्यादित नसून शून्यापासून यशाच्या शिखरापर्यंत पोहोचण्याचा खडतर प्रवास आहे.

आज एका सामान्य घरातील मुलीने स्वतःचे स्वप्न पूर्ण केलेच, पण तिच्याकडे पाहून ग्रामीण भागातील अनेक मुली स्वतःच्या पायावर उभे राहून समाजात आपली ओळख निर्माण करीत आहेत.

हर्षदा यांनी या धावपळीच्या जीवनात आपल्या कामाची छाप कर्तृत्वातून निर्माण केली असून, त्यांचा अभिमान आई-वडिलांसह संपूर्ण समाजाला आहे.

**संकलन – विद्या आळणे**
**शब्दांकन – रुपाली वाघरे/वैद्य**

# जागतिक दृष्टीदान दिवस

जगभरात दरवषी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी हा जागतिक दृष्टिदान दिवस साजरा केला जातो. त्यानिमित्त, आपले बाळ जन्मल्यानंतर पहिल्या तीस ते नव्वद दिवसात त्याची नजर स्थिर होत असते. या कालावधित बाळाच्या डोळ्यांची तपासणी नेत्रतज्ज्ञांकडून करणे अत्यंत गरजेचे असते. बऱ्याच बालकांना जन्मतः मोतीबिंदू असू शकतो किंवा डोळ्याच्या मागच्या पडद्याचे (रेटिनाचे) आजार असू शकतात. त्याचे निदान या तपासणीतून योग्य वेळी होऊन पुढील जीवनातील अनर्थ (अंधत्व) टाळता येवू शकते.

अनेक बालकांना मोबाईल, टॅब किंवा दूरदर्शन वापरावयास देऊन त्याचे आपण कौतुक करत बसतो, परंतु वरील उपकरणांचे प्रखर व अतिरिक्त प्रकाशामुळे डोळ्याातील परितारिका अकुंचन पावते व बाहुली लहान होत असते, पुढे अशा डोळ्यांना प्रकाश सहन न झाल्याने डोळ्याची क्षमता कमी होते. डोळ्याला पाणी येणे, डोके दुखणे, प्रखर सूर्यप्रकाश डोळ्याला सहन न होणे असे लक्षणे दिसून येतात.

बऱ्याच वेळा एकाच डोळ्यावर ताण पडून एक डोळा आळशी बनतो. त्याला आपण अम्ब्लायपिया म्हणतो. तो डोळा आळशी बनून तिरळेपणा पण उद्भव शकतो.

सर्वसाधारण इयत्ता पहिली ते महाविद्यालयीन काळातील विद्यार्थ्यांना दृष्टीदोषामुळे डोळ्याची नजर कमी असल्यास दूरचे अंधुक दिसते किंवा वाचन करताना पुस्तक गरजेपेक्षा कमी अंतरावर धरुन वाचन करावे लागते यामुळे पण डोके दुखणे सुरू होते. अशावेळी नेत्रतज्ज्ञांकडून नेत्र-तपासणी करुन योग्य नंबरचा चष्मा किंवा कॉन्टॅक्ट लेंस वापरल्यास हा दोष टाळता येतो. यावर लेजर उपचार पण अवलंब करता येते. वयाच्या चाळीस वर्षापासून पुढे डोळ्यातील सिलिअरी मसल्सच्या कार्यात बदल घडून येतो व वाचन करताना नजरेची अडचण भासू लागते, म्हणून प्रत्येक एक किंवा दोन वर्षानी नियमित नेत्र तपासणी करुन योग्य नंबरचा चष्मा वापरल्यास डोळ्याचे आरोग्य अबाधित राहून दैनंदिन जीवनातील डोळ्यांचे कार्य सुरळीत चालू शकते.

वृध्दत्वाकडे झुकत चाललेल्या व्यक्तीचे शरीर म्हणजे विविध आजारांचे माहेरघर असते. यामध्ये मोतीबिंद्, काचबिंदू, नेत्रपटलाशी संबंधित मॅच्युलर डिजनरेशन ही समस्या सर्रास उदभवणारी आहे.

वाढत्या वयात नेत्रपटलातील पैशी निकामी होतात. यामुळे पूर्णतः किंवा अंशतः अंध्यत्व येते. दैनंदिन कामे करता येत नाहीत. या समस्यांवर शास्त्रज्ञांनी नेमका उपाय शोधला आहे. युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनच्या डॉक्टरांनी स्टेम सेल्स अर्थात मूळ पेशीपासून मॅक्युलर डिजनरेशनवर तोडगा काढलाय. या बाबत डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार एक मूळपेशी घेवून नेत्रपटलात असलेल्या पेशीप्रमाणे तयार करण्यात आली. स्टेम सेल्सपासून साधारण एक लाख नेत्र पटल पेशी असलेला सहा मिलिमिटरचा एक पडदा तयार करण्यात आला. एका महिलेच्या डोळयांत हा पडदा प्रत्यारोपी करण्यात आला. सध्या ती स्त्री वेगाने बरी होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ही अत्यंत आनंददायी बाब गणल्या जात आहे.

**–एल. जी. चंदनकर**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य शासकीय नेत्र चिकित्सा
अधिकारी संघटना,
जि. नांदेड.

# दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढवावा -उपजिल्हाधिकारी अजय शिंदे

## अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त नांदेडमध्ये ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठी भाषेची प्राचीन परंपरा, समृद्ध साहित्य आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी नागरिकांनी दैनंदिन व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढवावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांनी केले.

अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त येथील जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी अजय शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास तहसीलदार विकास बिरादार, नायब तहसीलदार सुनंदा कऱ्हाळे, जिल्हा ग्रंथालयातील प्रताप सूर्यवंशी, डॉ. राममनोहर लोहिया नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेचे ग्रंथपाल श्रीनिवास इज्जपवार, शंकर पवार यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका आणि जिल्हाधिकारी कार्यालय सेतू समिती अभ्यासिकेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केंद्र शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण म्हणून दरवर्षी ३ ते ९ ऑक्टोबर हा कालावधी अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेचा गोडवा, तिचा ऐतिहासिक वारसा आणि समृद्ध साहित्यपरंपरेची ओळख शालेय विद्यार्थी व तरुण पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. मराठी भाषेविषयीचा अभिमान जनमानसात रुजविण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन महत्त्वपूर्ण असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारांना चालना मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मदत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचे सभासद होऊन वाचनाची आवड जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रताप सूर्यवंशी यांनी केले.

हे ग्रंथप्रदर्शन ९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सर्वांसाठी खुले राहणार आहे. नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन ग्रंथसंपदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## खा. रवींद्र चव्हाण यांच्या २५ लाखांच्या निधीतून वॉल कंपाऊंडच्या कामाला सुरुवात

**नायगाव (प्रतिनिध)–** नायगाव शहरातील तमाम बौद्ध बांधवांचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न साकार होण्याच्या दिशेने आता महत्त्वाचे पाऊल पडले आहे. शहरातील पवित्र कुशिनारा बौद्ध विहाराच्या वॉल कंपाऊंडच्या कामाला अधिकृतपणे सुरुवात झाली असून, नायगावचे भूमिपुत्र तथा नांदेडचे खासदार रवींद्र वसंतराव पाटील चव्हाण यांनी आपल्या खासदार निधीतून या कामासाठी २५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीमुळे बौद्ध विहाराच्या विकासाला गती मिळाली असून, नायगाव शहरासह संपूर्ण तालुक्यातील बौद्ध समाजातून समाधान व्यक्त होत आहे.

स्वर्गीय खासदार वसंतराव चव्हाण यांच्या हयातीत नायगाव शहरात भव्य आणि देखणे बुद्ध विहार उभारण्याची संकल्पना पुढे आली होती. मात्र, त्यांच्या अकाली निधनामुळे या संकल्पनेला अपेक्षित गती मिळू शकली नाही. आता त्यांच्या पश्चात खासदार रवींद्र चव्हाण यांनी या महत्त्वपूर्ण कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याने, अपुरे राहिलेले स्वप्न पूर्णत्वाकडे नेण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली आहे. त्यामुळे कुशिनारा बौद्ध विहाराच्या परिसरात सुरू झालेल्या वॉल कंपाऊंडच्या कामाकडे केवळ विकासकाम म्हणून नव्हे, तर समाजाच्या दीर्घकालीन अपेक्षांच्या पूर्ततेची सुरुवात म्हणून पाहिले जात आहे.

कुशिनारा बौद्ध विहार हे केवळ एक बांधकाम नसून बौद्ध समाजाच्या श्रद्धेचे, भगवान गौतम बुद्धांच्या धम्मविचारांचे, सामाजिक एकतेचे आणि समतेच्या मूल्यांचे केंद्र व्हावे, अशी स्थानिक बौद्ध बांधवांची अपेक्षा आहे. या ठिकाणी धम्मविषयक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, विविध धार्मिक आयोजनांसह भावी पिढ्यांमध्ये प्रबोधन आणि संस्कार रुजविणारे उपक्रम राबविता यावेत, अशी समाजाची भावना आहे.

या विकासकामासाठी सहकार्य केल्याबद्दल खासदार रविंद्र चव्हाण यांचे समाजाच्या वतीने अभिनंदन करून जाहीर आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# सातबारावरील बोजे तत्काळ कमी करण्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे निर्देश

## भू-विकास बँक कर्जमाफीधारकांना पीक कर्जाचा मार्ग मोकळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शासन निर्णयानुसार भू-विकास बँकेच्या सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांचे कर्ज पूर्णतः माफ करण्यात आले असून, त्यांच्या सातबारा उताऱ्यावरील भू-विकास बँकेच्या कर्जबोजाच्या नोंदी कमी करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. कर्जबोजाची नोंद अभिलेखावर कायम असल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना पीक कर्ज घेताना अडचणी येऊ नयेत, यासाठी सर्व तहसीलदारांनी प्रलंबित नोंदी सरसकट कमी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

दि. ९ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयानुसार नांदेड जिल्ह्यातील भू-विकास बँकेच्या थकबाकीदार शेतकऱ्यांचे कर्ज पूर्णतः माफ करण्यात आले आहे. त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनीवरील भू-विकास बँकेच्या कर्जबोजाच्या नोंदी कमी करण्याचे निर्देश यापूर्वीही देण्यात आले होते. बहुतांश ठिकाणी ही कार्यवाही पूर्ण झाली आहे. काही ठिकाणी सातबारा उताऱ्यावर कर्जबोजाच्या नोंदी अद्याप कायम असल्याचे निदर्शनास आले आहे.

भू-विकास बँकेशी संबंधित भू तारण बँक, भू विकास बँक आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण विकास बँक मर्या., मुंबई या नावांनी सातबारा उताऱ्यावर नोंद असलेले कर्जबोजे सरसकट कमी करण्याची कार्यवाही तहसीलदारांनी तात्काळ करावी. यासाठी भू-विकास बँक अथवा सहकार विभागाकडून स्वतंत्र ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

भू-विकास बँकेच्या कर्जाची शासनाने कर्जमाफी केली असल्याने संबंधित शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना भू-विकास बँकेच्या ना-हरकत दाखल्याची मागणी करू नये. उर्वरित कर्जबोजाच्या नोंदी कमी करण्याची कार्यवाही सुरू असल्याने, अशा शेतकऱ्यांना तूर्त बोजाविरहित गृहीत धरून पीक कर्ज वितरणाची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.

याबाबत जिल्हा अग्रणी बँकेच्या व्यवस्थापकांनी जिल्ह्यातील सर्व बँका व वित्तीय संस्थांना आवश्यक सूचना द्याव्यात. पात्र शेतकरी कोणत्याही परिस्थितीत पीक कर्जापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेऊन त्यांना सुलभ व तातडीने कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी निर्देशित केले आहे.

## खो-खो स्पर्धेत पारडी जिल्हा परिषद शाळेचा संघ ठरला तालुक्यात अव्वल



**लोहा (प्रतिनिधी)–** तालुका स्तरीय खो-खो क्रीडा स्पर्धेत पारडी जिल्हा परिषद शाळेचा संघाने विजयश्री खेचीत तालुक्यात अव्वल स्थान प्राप्त केले आहे.

शिवछत्रपती उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणामध्ये तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुले, मुली, १७ वर्षांखालील मुले-मुली व १९ वर्षे खालील मुले-मुली असे तब्बल ४८ संघ मैदानावर दाखल झाले होते. १४ वर्षाखालील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारडी संघाने आत्मविश्वासाच्या जोरावर कलंबर, सह्याद्री इंग्लिश स्कूल व मातब्बर अशा महेश विद्यालय शेवडीच्या संघाला हरवत विजयश्री खेचून आणली. त्यांच्या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक तथा खो खो प्रशिक्षक माधव किसवे, लोहा पंचायत समितीचे इंजिनियर तथा लातूर जिल्हा खो-खो असोसिएशनचे पंच रुपेश चोपणे, मल्लिकार्जुन कहाळेकर, फारुख शेख, व्ही. एम. मंगनाळे, ज्येष्ठ शिक्षिका ज्योती कदम, इंगोले, वाडीकर, देशमुख, मरखेलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पारडीच्या या विजयी संघांचे लोहा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संतोष गंगाजी, शिक्षण विस्तार अधिकारी सतीश व्यवहारे, लोहा बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल आचणे, लोहा तालुका क्रीडा संयोजक तथा तालुका क्रीडा अधिकारी विलास नागेश्वर, क्रीडा शिक्षक व्यंकट लुंगारे, केंद्रप्रमुख बी. टी. केंद्रे, सर्जेराव टेकाळे, केंद्रप्रमुख बाबुराव फसमले, बी. वाय. चव्हाण, पाराजी पोले, मुख्याध्यापक अनिल हमदे, हरी धुतमल, कहाळेकर लोहा, बी. डी. जाधव, संतोष साखरे, राजेंद्र पाटील, मुख्याध्यापक वडजे,पूजरवाड बेरळीचे माजी मुख्याध्यापक कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

## आविष्कार २०२६ जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे दुहेरी सुवर्णयश



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत आयोजित 'आविष्कार २०२६' जिल्हास्तरीय संशोधन स्पर्धेत प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेडच्या विद्यार्थिनींनी दोन सुवर्णपदके मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले.

कु. अहनिशकौर भोसीवाले, बी.कॉम. तृतीय वर्ष, वाणिज्य विभाग हिने PLUGGING THE LEKS How I gents CBDCs Can Make Government Subsidies Smarter, Fairer and Leak-Resistant हा संशोधन प्रकल्प सादर केला. I gents Am{U Central Bank Digital Currencies (CBDCs) यांच्या माध्यमातून शासकीय अनुदान वितरण अधिक पारदर्शक, कार्यक्षम व गळतीरोधक कसे करता येईल, याचा अभ्यास या प्रकल्पात करण्यात आला. या प्रकल्पाला प्रथम क्रमांकाचे सुवर्णपारितोषिक मिळाले.

कु. सानिया परवीन मोहम्मद आझम, एम.ए. द्वितीय वर्ष, इंग्रजी विभाग हिने From LOL to Language Evolution: Decoding the New English of the Digital Generation हा संशोधन प्रकल्प सादर केला. सोशल मीडिया, डिजिटल कम्युनिकेशन, इंटरनेट स्लँग, संक्षिप्त शब्द आणि तरुण पिढीतील बदलत्या इंग्रजी भाषिक प्रवाहांचा या प्रकल्पात अभ्यास करण्यात आला. या संशोधनासाठी UG Category मध्ये प्रथम क्रमांकाचे सुवर्णपारितोषिक प्राप्त झाले.

या उल्लेखनीय यशाबद्दल विजेत्या विद्यार्थिनींचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षणमंत्री डी. पी. सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

दोन्ही संशोधन प्रकल्पांच्या यशामागे आविष्कार समन्वयक डॉ. गजानन वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. विषयाची निवड, संशोधनाची मांडणी, विश्लेषण, सादरीकरण आणि स्पर्धेच्या दृष्टीने तयारी याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

या दुहेरी सुवर्णयशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. आर. गंगाखेडकर, उपप्राचार्य डॉ. डी. के. स्वामी, IQC समन्वयक डॉ. एस. डी. राऊत, आविष्कार समन्वयक व वाणिज्य विभागप्रमुख डॉ. गजानन वाघमारे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. स्वाती तांडे, डॉ. ममता मालवीय, डॉ. पाटील नीलकंठराव, डॉ. मारोती लुटे, डॉ. बाळासाहेब शिंदे, डॉ. जयश्री देशमुख, डॉ. रवी लाठकर, डॉ. दीपक वाघमारे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

## डाक जीवन विमा योजनेअंतर्गत थेट विमा प्रतिनिधी पदासाठी मुलाखत

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड डाक विभागाच्या वतीने डाक जीवन विमा (पीएलआय) आणि ग्रामीण डाक जीवन विमा (आरपीएलआय) योजनेंतर्गत थेट विमा प्रतिनिधी (विमा सल्लागार) म्हणून नियुक्तीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत. इच्छुक पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज भरून दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत अधीक्षक डाकघर कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड येथे स्वखर्चाने थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. अर्ज अधीक्षक डाकघर कार्यालय, नांदेड विभाग येथे उपलब्ध आहेत.

उमेदवाराचे वय मुलाखतीच्या दिवशी किमान १८ वर्षे असावे. तसेच केंद्र किंवा राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त मंडळाची इयत्ता १० वी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. बेरोजगार व स्वयंरोजगार व्यक्ती, माजी विमा सल्लागार, विमा कंपन्यांचे माजी विमा प्रतिनिधी, माजी सैनिक, सेवानिवृत्त शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्त्या, महिला मंडळ कार्यकर्ते, ग्रामप्रधान, ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गटांच्या सदस्यांसह पात्र व्यक्ती अर्ज करू शकतात. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस येताना बायोडाटा, मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्रे अथवा अनुभव प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे सोबत आणावीत, असे आवाहन अधीक्षक डाकघर, नांदेड विभाग यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी परवानाधारक व्यापाऱ्यांनाच शेतमाल विक्री करण्याचे आवाहन

**मुदखेड (प्रतिनिधी)–** खरीप हंगाम २०२६-२०२७ मध्ये शेतमालाची आवक सुरू झाल्याने शेतकऱ्यांनी शेतमाल विक्री करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी आणि केवळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे वैध अनुज्ञप्तीधारक (परवानाधारक) व्यापाऱ्यांनाच शेतमाल विकावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती, मुदखेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतमाल विक्रीपूर्वी संबंधित व्यापारी हा अनुज्ञप्तीचे नुतीकरण केलेला परवानाधारक आहे का, शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर केले जाते का, आणि शेतमाल व्यवहाराची पक्की पावती दिली जाते का, याची खात्री करूनच व्यवहार करावा.

अनेक व्यापारी थेट शेतात किंवा बांधावर येऊन अधिक दराचे आमिष दाखवून शेतमाल खरेदी करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, अशा व्यवहारामध्ये अनेकदा शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी विशेष दक्षता बाळगण्याची गरज असल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांचे नुकसान, फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. अधिकृत परवानाधारक व्यापार्यांव्यतिरिक्त इतरांकडे शेतमालाची विक्री केल्यास वजनात फसवणूक, कमी पैसे मिळणे किंवा संपूर्ण रक्कम न मिळण्याचा धोका संभवतो त्यामुळे कोणत्याही अमिषाला बळी न पडता सर्व बाबींची खात्री करूनच अधिकृत व्यापाऱ्यांशी व्यवहार करावेत, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती मुदखेडच्या वतीने प्रशासक सुनील गनलेवार, सचिव परिक्षित मुंगल यांनी केले आहे.

## मनाठा ठाण्यातील हवालदार अशोक दाढेविरुद्ध लाचेचा गुन्हा दाखल; पडताळणीत ५ हजारांची मागणी स्पष्ट, एसीबीची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जप्त केलेली मोटारसायकल परत देण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच मागणाऱ्या पोलीस अंमलदाराविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. पडताळणी सापळ्यात सदर पोलीस हवालदार अशोक दाढे यांनी पाच हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

मनाठा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका २८ वर्षीय तक्रारदार याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन मनाठा येथे दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी कारवाई करून त्यांची मोटारसायकल ताब्यात घेण्यात आली होती. ती मोटारसायकल परत देण्यासाठी तेथील बीट हवालदार अशोक दाढे यांनी ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.

याबाबत तक्रारदाराने दि. १३ ऑगस्ट रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडे तक्रार दिली. दि. १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३१ वाजता पोलीस स्टेशन मनाठा येथे सापळा पडताळणी केली असता, लोकसेवक अशोक दाढे यांनी ५ हजार रुपये लाच मागून ती स्वतः स्वीकारण्याची संमती दिल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान, दि. ३१ ऑगस्ट रोजी मूळ तक्रारदाराचा लोकसेवकाला संशय आल्याने तो आता पैशाची मागणी करणार नाही, असे कळवल्याने सापळा कारवाई पुढे होऊ शकली नाही. मात्र, पडताळणीत लाच मागणी स्पष्ट झाल्याने आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस स्टेशन मनाठा येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपीला अद्याप ताब्यात घेण्यात आलेले नाही. पोलीस निरीक्षक रसूल तांबोळी यांनी पोलीस उपाधीक्षक राहुल तरकसे यांच्या मार्गदर्शनाखाली आपले सहकारी हवालदार संतोष वच्चेवार, प्रकाश मामुलवार, बालाजी मेकाले, शिवानंद रापतवार यांना सोबत घेऊन ही कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनी पथकाचे कौतुक केले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी माहिती किंवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुद्ध तक्रार असल्यास विभागाशी संपर्क साधावा.

## नांदेड परिमंडलात 'पीएम सूर्यघर' योजनेला प्रतिसाद; २७ हजार घरांवर १०६ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश असलेल्या महावितरणच्या नांदेड परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना प्रभावीपणे राबविली जात आहे. सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत या योजनेंतर्गत २७,१३८ घरांच्या छतावर १०६.६४ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती केली जात आहे.

महावितरणने ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान असलेल्या या योजनेत इतर ग्राहकांनीही सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. घराच्या छतावरील सौर पॅनेलद्वारे होणारी वीजनिर्मिती घरगुती वापरापेक्षा अधिक असेल तर वीजबिल शून्यावर येते. जादा वीज महावितरणला विकून उत्पन्न मिळवण्याची संधीही या योजनेत आहे. साधारणपणे १ किलोवॅटच्या प्रकल्पातून महिन्याला १२० युनिट, २ किलोवॅटमधून २४० युनिट तर ३ किलोवॅटच्या प्रकल्पातून ३६० युनिट वीज निर्मिती होते.

१ किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, २ किलोवॅटसाठी ६० हजार रुपये तर ३ किलोवॅट व त्यापुढील क्षमतेसाठी ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदरात कर्ज सुविधाही उपलब्ध आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी https://pmsuryaghar.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. तसेच नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी उभारलेल्या 'सेवासेतू' केंद्रातून नागरिकांना माहिती व सहकार्य मिळणार आहे.

## ज्ञानेश्वरी अभ्यासार्थींसाठी आता ज्ञानेश्वरी एआय

**नांदेड (प्रतिनिधी)–** दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशनच्या तंत्रज्ञान शाखेतील टीमने माऊली ज्ञानेश्वरांच्या ग्रंथाचा आधुनिक तंत्रज्ञानातील कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयची मदत घेऊन केलेल्या अॅपचे नवरात्रातील पहिल्या माळेच्या मुहूर्तावर लोकार्पण करण्यात आले आहे.

पुण्यातील आनंद जोगळेकर व त्यांचे कुटुंब आणि सहकारी मिळून ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील अनेक शब्द, त्यांच्या व्याख्या आणि या संदर्भातील विचारलेल्या प्रश्नांना काही क्षणात उत्तरे देणारे हे अॅप तयार केले आहे. विशेषतः तरुण पिढीसाठी हे साधन फारच उपयुक्त आहे. मानवी जीवनातील ताण-तणाव, कौटुंबिक, आर्थिक, वैचारिक प्रश्नांवर हे अॅप संदर्भांकित ओव्या आणि त्याचा अर्थ देऊन उत्तर देण्याचा प्रयत्न करते.

पान १ वरून...

**कृतज्ञता व्यक्त करीत...**

उभे केल्याचे त्यावेळच्या आठवणी जागवल्या. सप्टेंबर २०२५ साली नांदेड जिल्ह्यातील २५० कुटुंबांना प्रत्येकी १५ हजार रुपये मदत देण्यासाठी नांदेडमध्ये आलेल्या नाना पाटेकर यांनी 'गोदातीर समाचार' कार्यालयात घेतलेल्या बैठकीचे घडलेल्या प्रसंगांची आठवण सांगितली. त्यानंतर २०२२ मध्ये दीडशे कुटुंबांना प्रत्येकी २५ हजार रुपयांची मदत, जलसंधारणाची कामे करण्यात आली. अशा विविध माध्यमातून शेतकरी आणि शेतीपुरक गोष्टींसाठी नानांचे कार्य आर्थिक मदतीपलीकडे जाऊन माणुसकीची भिंत उभारण्याचे होते, अशा शब्दांत त्यांनी नानांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

**गुणवंत पाटील हंगरगेकर** यांनी नानांनी शेतकरी आणि जवान या दोन्ही घटकांप्रती कृतीतून कृतज्ञता व्यक्त केल्याचे सांगत, नानांच्या पश्चातही जिल्ह्यात 'नाम'चे कार्य अखंड सुरू ठेवणे हीच खरी श्रद्धांजली असल्याचे नमूद केले.

**संपादक शंतनू डोईफोडे** यांनी नानांच्या अचूक वेळेच्या भानाचा संदर्भ देत, अभिनयातील प्रत्येक कामाची वेळ त्यांनी साधली; मात्र आयुष्यातील एक्झिट मात्र चुकीच्या वेळी झाली, अशी भावस्पर्शी प्रतिक्रिया व्यक्त केली. सध्या महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत असताना नानांच्या कार्याची गरज अधिक भासत असल्याचेही त्यांनी सांगितले. समाजासाठी झटणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्था सक्षम करण्याची गरज त्यांनी मांडली.



**अनिल मोरे** यांनी अभिनय त्यांचा व्यवसाय होता; समाजसेवा ही त्यांची आवड होती आणि पुढे तीच जीवनध्येय बनली, असे सांगत नानांच्या व्यक्तिमत्त्वाचे सार मांडले. आकाशाएवढी उंची मिळालेल्यांनी या मातीतील माणसांना खांद्यावर घेण्याची संवेदना जपावी, हा नानांच्या जीवनाचा संदेश असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नाना सोबतच्या जुन्या आठवणी सांगितल्या.

**प्रणिताताई देवरे चिखलीकर** यांनी कंधार- लोहा तालुक्यातील ५० गावांचा गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार उपक्रमात समावेश झाल्याचे सांगितले. जलसंधारण, वृक्षारोपण आणि शेती सक्षम करून आत्महत्या रोखण्याचा नानांचा व्यापक विचार पुढे नेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात अनेकांनी नानांना शब्दरूपी श्रद्धांजली वाहिली.

**भाऊसाहेब मोरे** यांनी बँकांनी आपल्या निधीतून काही हिस्सा शेतकरी कल्याणासाठी द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदतीसोबतच मुलांचे शिक्षण आणि महिलांच्या प्रश्नांनाही आधार देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

कृतज्ञता सभेचे सूत्रसंचालन गझलकार बापू दासरी यांनी केले. नानांच्या आठवणींनी भारावलेल्या या सभेचा केंद्रबिंदू शोक नव्हता, तर नानांनी पेटवलेली सामाजिक संवेदनशीलतेची ज्योत पुढे नेण्याचा सामूहिक संकल्प हा होता.

या कार्यक्रमासाठी गोदातीर समाचार परिवारातील आशुतोष घोणसे पाटील, प्रल्हाद कांबळे, मनोहर कदम, दीपक पुयड, रमेश चित्ते, प्रा. अमृत जाधव, रमेश ठाकूर, बालाजी वट्टमवार, किरण वाठोरे, पुष्पा कुलकर्णी, जळबा लखे आदींनी नियोजन केले.

-----------

**विरोधी पक्षांचा पहिल्यांदाच...**

आलं होतं. त्यामुळे काँग्रेस शासित राज्याचे मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष, आमदार, खासदार या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. विरोधी पक्षांचे नेते सुद्धा सहभागी झाले होते. त्यामुळे अशा अभूतपूर्व एकजूट मोर्चामध्ये दिसून आली. विरोधी नेत्यांनी बाराखंबापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढला. बाराखंबा येथून सर्वोच्च न्यायालयाकडे मोर्चा काढणाऱ्या राहुल गांधी यांना भगवान दास रोडवर थांबवण्यात आले. दिल्ली पोलिसांनी तेथे बॅरिकेड्स लावून पुढील हालचाल रोखली. भगवान दास रोडवर निमलष्करी दल आणि उत्तर प्रदेश पोलिसांसह मोठ्या संख्येने पोलीस दल तैनात करण्यात आले होते.

# जनतेचे फोन उचलण्यास गटविकास अधिकाऱ्यांची टाळाटाळ?

## दुष्काळात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या मुख्यालयातील उपस्थितीवर प्रश्नचिन्ह

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** एककडे दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना, दुसरीकडे बिलोली पंचायत समितीच्या प्रशासकीय कामकाजाबाबत नागरिकांकडून तीव्र प्रश्न उपस्थित केले जात आहेत. सामान्य नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता फोनला प्रतिसाद मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपल्या अडचणी मांडायच्या तरी कुणाकडे, असा सवाल केला जात आहे.

बिलोली पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या विविध गावां-मध्ये पाणीटंचाईसह मूलभूत सुविधांशी संबंधित समस्या गंभीर होत आहेत. काही गावांमध्ये ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालयी नियमित उपलब्ध नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पिण्याचे पाणी, पाणीपुरवठ्याचे नियोजन, स्वच्छता आणि इतर स्थानिक प्रश्नांसाठी नागरिकांना संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा लागतो; मात्र अधिकारी उपलब्ध नसल्यास समस्यांचे निराकरण रखडत आहे.

दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्राला नुकतीच भेट दिली. वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करत असताना, स्थानिक स्तरावरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत तक्रारी येत असल्याने त्यांची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत अधिकारी उशिरा गावात येतात आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी वेळ देत नाहीत, अशाही तक्रारी केल्या जात आहेत.

बायोमेट्रिक हजेरी व प्रभावी संपर्क यंत्रणेची मागणी या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून काही प्रमुख मागण्या पुढे येत आहेत.

बिलोली पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुख्यालयी वास्तव्याची आणि हजेरीची नियमित तपासणी करून 'बायोमेट्रिक हजेरी प्रणाली' प्रभावीपणे राबवावी, अशी मागणीही शंकरनगर परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार



# डेअरी व्यवसाय फायद्यात आणायचा?

## आधी समजून घ्या दुधाचे अर्थकारण!

**» दूध उत्पादनात भारत आघाडीवर; मात्र उत्पादकता वाढविणे, पशुखाद्याचे योग्य नियोजन आणि प्रति लिटर उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक**

**दुग्धव्यवसाय हा ग्रामीण भागातील उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. मात्र, जनावरांची कमी उत्पादकता, खाद्य व्यवस्थापनातील त्रुटी आणि वाढता खर्च यामुळे अनेक पशुपालकांना अपेक्षित नफा मिळत नाही. केवळ दुधाला चांगला दर मिळण्यावर अवलंबून न राहता उत्पादनक्षमता आणि दुधाची गुणवत्ता वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. त्यासाठी गाय की म्हैस निवडावी, एका लिटर दुधासाठी किती खर्च येतो आणि पशुखाद्य घरच्या घरी तयार करणे परवडते का, या बाबींचा अभ्यास करणे गरजेचे आहे.**

### गाय की म्हैस? दूध विक्रीच्या बाजारपेठेचा विचार करा

दुग्धव्यवसाय सुरू करताना गाय किंवा म्हैस निवडण्यापूर्वी स्थानिक बाजारपेठ, दुधाला मिळणारा दर आणि उपलब्ध सुविधांचा विचार करावा. म्हशीच्या दुधात फॅट आणि एसएनएफचे प्रमाण सामान्यतः गायीच्या दुधापेक्षा अधिक असते. त्यामुळे अनेक ठिकाणी म्हशीच्या दुधाला तुलनेने अधिक दर मिळतो. दुसरीकडे, संकरित गायींची दूध देण्याची क्षमता अधिक असू शकते. संकरित गाय एका वेतात सुमारे ३ ते ५ हजार लिटर, तर देशी गाय एक ते दोन हजार लिटर दूध देऊ शकते. म्हशीचे दूध उत्पादनही तिची जात, आहार आणि व्यवस्थापनानुसार बदलते. त्यामुळे केवळ दूध उत्पादनाचे आकडे पाहून जनावरांची निवड करणे योग्य ठरणार नाही. दूध थेट ग्राहकांना विकायचे आहे की डेअरीला द्यायचे, परिसरात गायींचे प्रमाण अधिक आहे की म्हशींचे, याचाही विचार करावा. उन्हाळ्यात म्हशींना उष्णतेचा अधिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे पाणी, सावली, थंडावा आणि योग्य निवारा उपलब्ध आहे का, हे तपासणे महत्त्वाचे आहे.

### एका लिटर दुधाचा खर्च कसा काढाल?

दुग्धव्यवसाय नफ्यात आहे की तोट्यात, हे समजण्यासाठी प्रति लिटर दूध उत्पादन खर्च मोजणे आवश्यक आहे. यामध्ये जनावरांची खरेदी, चारा व पशुखाद्य, औषधोपचार, मजुरी, गोठ्याचा खर्च आणि दूध काढण्याच्या यंत्रांसारख्या साधनांचा खर्च विचारात घ्यावा. जनावरांच्या उत्पादनक्षम आयुष्यातील खर्च आणि दूध न देण्याचा कालावधी यांचाही हिशेबात समावेश करणे गरजेचे आहे. एचएफ संकरित गायीच्या एका लिटर दुधासाठी सुमारे २७ ते २८ रुपये खर्च येऊ शकतो. मात्र, हा खर्च जनावराची उत्पादकता, खाद्याचे दर, मजुरी आणि व्यवस्थापनानुसार बदलतो. गायीचे दूध उत्पादन कमी झाल्यास प्रति लिटर खर्च वाढतो; उत्पादन वाढल्यास तो कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रत्येक जनावराचे दूध उत्पादन आणि त्यावर होणारा खर्च नियमित नोंदवावा. दुधाची विक्री किंमत आणि उत्पादन खर्च यांची तुलना केल्यास व्यवसायातील नफा-तोट्याचे चित्र स्पष्ट होते.

### घरच्या घरी पशुखाद्य तयार करावे का?

जनावरांच्या आहारात ऊर्जा आणि प्रथिनांचा योग्य समतोल असणे आवश्यक आहे. पशुखाद्याचा खर्च कमी करण्यासाठी काही पशुपालक घरच्या घरी खाद्य तयार करण्याचा विचार करतात. मात्र, त्यासाठी उपलब्ध कच्चा माल, त्याचे दर, प्रक्रिया करण्यासाठी लागणारी यंत्रे आणि पोषणमूल्यांची तपासणी यांचा विचार करावा. २५ पेक्षा कमी जनावरे असलेल्या पशुपालकांसाठी तयार पशुखाद्य वापरणे अधिक सोयीचे ठरू शकते. कारण खाद्य तयार करण्यासाठी लागणारी ग्राइंडर, मिक्सर यांसारखी यंत्रे खरेदी करणे कमी जनावरांच्या संख्येत परवडेलच असे नाही, तर २५ पेक्षा अधिक जनावरे असल्यास घरच्या घरी पशुखाद्य तयार करण्याचा पर्याय तपासता येतो. मात्र, जनावरांची संख्या हा एकमेव निकष नाही. कच्च्या मालाची उपलब्धता, यंत्रसामग्रीचा खर्च आणि तयार खाद्याच्या तुलनेतील बचत यांची तुलना करावी. पशुखाद्यातील घटकांचे प्रमाण अचूक ठेवण्यासाठी वजनकाटा वापरणे आणि कच्च्या मालाची गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे. खाद्य तयार करताना पशुपोषण तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.



### नियोजनातून वाढवा दुग्धव्यवसायाची उत्पादकता

दुग्धव्यवसायात टिकाऊ नफा मिळविण्यासाठी केवळ जनावरांची संख्या वाढविणे पुरेसे नाही. योग्य जनावरांची निवड, संतुलित आहार, नियमित आरोग्य तपासणी, स्वच्छता आणि दूध उत्पादनाच्या नोंदी यांना महत्त्व द्यावे. दुधाचा दर, खाद्याचा खर्च आणि जनावरांची उत्पादकता यांचा नियमित आढावा घेतल्यास अनावश्यक खर्च कमी करून व्यवसाय अधिक कार्यक्षम बनवता येऊ शकतो.

# दुग्धव्यवसाय सक्षम करण्यासाठी नियोजन, स्वच्छता अन् अर्थकारण!



## जमाखर्चाच्या नियमित नोंदींपासून जनावरांच्या आरोग्यापर्यंत लक्ष द्या; शेणखत, गोबरगॅस आणि पशुखाद्य निर्मितीतूनही उत्पन्नाची संधी

**दुग्धव्यवसाय हा केवळ शेतीला पूरक व्यवसाय नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणारे महत्त्वाचे साधन आहे. मात्र, वाढता उत्पादन खर्च, जनावरांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष आणि व्यवस्थापनातील त्रुटींमुळे अपेक्षित नफा मिळविण्यात अडचणी येतात. त्यामुळे दुग्धव्यवसायाकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहणे, नियमित जमाखर्च ठेवणे आणि दूध उत्पादनाची गुणवत्ता टिकविणे आवश्यक आहे. भारत दूध उत्पादनात आघाडीवर असला, तरी जनावरांची उत्पादकता वाढविणे हे मोठे आव्हान आहे. यासाठी पशुपालकांसोबतच दूध संकलन संस्था आणि सहकारी दूध संघांनीही नियोजनबद्ध प्रयत्न करणे गरजेचे आहे.**

### जमाखर्चाच्या नोंदी ठेवा

दुग्धव्यवसायातील नफा-तोटा समजून घेण्यासाठी दूध विक्रीतून मिळणारे उत्पन्न आणि चारा, पशुखाद्य, औषधे, मजुरी यांसह सर्व खर्चांच्या नियमित नोंदी ठेवाव्यात. खर्च वाढत असल्याचे लक्षात आल्यास त्याची कारणे शोधून अनावश्यक खर्चावर नियंत्रण आणावे. केवळ दूध विक्रीतून मिळणारी रक्कम म्हणजे नफा, असा समज ठेवू नये. गाय किंवा म्हैस खरेदी करताना तिचे वय, आरोग्य, दूध देण्याची क्षमता आणि वेताचा इतिहास तपासावा. नुकत्याच व्यालेल्या, शक्यतो दुसऱ्या किंवा तिसऱ्या वेतातील जनावराला प्राधान्य देता येते. खरेदीपूर्वी सलग तीन वेळा दूध काढून उत्पादनाची खात्री करावी. पशुवैद्यकाचा सल्ला घेतल्यास चुकीची निवड टाळण्यास मदत होते.

### स्वच्छ गोठा, गुणवत्तापूर्ण दूध

गोठ्यात पुरेसा प्रकाश आणि खेळती हवा असावी. जमीन कोरडी व स्वच्छ ठेवावी. दूध काढण्याची जागा, कास, दूध साठविण्याची भांडी आणि धार काढणाऱ्या व्यक्तीचे हात स्वच्छ असणे आवश्यक आहे. प्रत्येक वेळी दूध काढण्यापूर्वी कास स्वच्छ पाण्याने धुऊन स्वच्छ कपड्याने कोरडी करावी. दूध काढल्यानंतर जागेची स्वच्छता राखावी. आजारी किंवा संसर्गजन्य रोगाची लक्षणे असलेल्या जनावरांना निरोगी जनावरांपासून वेगळे ठेवावे. अशा जनावरांच्या दुधाची हाताळणी पशुवैद्यकीय सल्ल्यानुसार करावी. दूध काढणाऱ्या व्यक्तीने नखे स्वच्छ व लहान ठेवावीत, स्वच्छ कपडे वापरावेत आणि साबणाने हात धुवावेत. यांत्रिक दूध काढणीचा वापर करताना यंत्रांची नियमित स्वच्छता व देखभाल करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### दूध संकलन संस्थांचीही जबाबदारी

गावपातळीवरील दूध सोसायट्यांनी दूध संकलन, गुणवत्ता तपासणी आणि वाहतुकीची व्यवस्था सक्षम करावी. दूध उत्पादकांच्या नोंदी अद्ययावत ठेवून ठरलेल्या वेळेत बिलांचे पैसे देणे आवश्यक आहे. पशुपालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केल्यास दूध उत्पादन आणि गुणवत्तेत सुधारणा होऊ शकते. व्यवस्थापन चांगले असलेल्या दूध सोसायट्यांनी स्वतःचा पशुखाद्य निर्मिती उद्योग सुरू करण्याचाही विचार करावा. एकट्या संस्थेला हे शक्य नसल्यास तीन-चार सोसायट्या एकत्र येऊन असा उपक्रम राबवू शकतात. त्यामुळे सभासदांना दर्जेदार पशुखाद्य उपलब्ध होण्यासोबतच ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात.

» गर्भधारणा आणि आरोग्य व्यवस्थापनावर भर : जनावरांची दूध उत्पादनक्षमता टिकविण्यासाठी योग्य प्रजनन व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. कृत्रिम रेतनासाठी गुणवत्तापूर्ण रेतमात्रा वापरणे आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे. जनावरांच्या गर्भधारणेच्या तारखा, वेत, दूध उत्पादन आणि आरोग्यविषयक नोंदी व्यवस्थित ठेवाव्यात.

» वासरांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष नको : वासराला जन्मानंतर वेळेवर चीक मिळणे आणि त्याच्या पोषणाची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. वासराला आईपासून दूध पाजण्याची पद्धत वापरताना त्याला पुरेसे दूध मिळते का, यावर लक्ष ठेवावे. अन्यथा दूध पिण्याचे प्रमाण मोजणे कठीण होऊ शकते. वासराचे आरोग्य आणि गायीचे दूध उत्पादन या दोन्हींचा विचार करून योग्य पद्धतीने संगोपन करावे.

» शेणापासूनही मिळू शकते उत्पन्न : दुग्धव्यवसायात शेणाचा योग्य वापर केल्यास अतिरिक्त उत्पन्नाचा मार्ग खुला होऊ शकतो. शेणापासून सेंद्रिय खत तयार करता येते. जनावरांची संख्या आणि उपलब्ध शेणाचे प्रमाण लक्षात घेऊन गोबरगॅस प्रकल्प उभारण्याचाही पर्याय तपासता येतो. यामुळे इंधनाची गरज भागविण्यास मदत होते आणि योग्य व्यवस्थापन असल्यास खर्चात बचत होऊ शकते.

» दूध साठवणूक आणि वाहतुकीत काळजी : दूध साठविण्यासाठी स्वच्छ, अन्नसुरक्षेसाठी योग्य आणि झाकण असलेली भांडी वापरावीत. दूध गाळून योग्य तापमानात ठेवावे. धूळ, माशा आणि इतर दूषित घटकांपासून त्याचे संरक्षण करावे. संकलन केंद्रापासून प्रक्रिया केंद्रापर्यंत दूध वेळेत आणि योग्य तापमानात पोहोचेल, याची काळजी घ्यावी.

» जनावरांचा विमा उतरविणेही आवश्यक : दुभत्या जनावरांचा विमा उतरविल्यास अनपेक्षित नुकसानीचा आर्थिक भार कमी करण्यास मदत होऊ शकते. विमा योजना, पात्रता, हप्ते आणि उपलब्ध शासकीय अनुदान यांची माहिती पशुपालकांनी संबंधित विमा कंपनी, दूध सोसायटी किंवा दूध संघाकडून घ्यावी. एकूणच, दुग्धव्यवसाय सक्षम करण्यासाठी केवळ दूध उत्पादन वाढविणे पुरेसे नाही. आर्थिक शिस्त, जनावरांचे आरोग्य, स्वच्छता, गुणवत्तापूर्ण दूध आणि पूरक उत्पन्नाचे स्रोत यांचा एकत्रित विचार केल्यास व्यवसाय अधिक कार्यक्षम आणि टिकाऊ बनविता येऊ शकतो.



# गाई-म्हशींचे दूध वाढविण्यासाठी बायपास प्रथिनांचे तंत्र काय?

## चाराटंचाईत प्रथिनांची कमतरता भरून काढण्यास मदत; योग्य आहार नियोजनातून दूध उत्पादन आणि जनावरांचे आरोग्य राखण्यावर भर

**गाई-म्हशींचे दूध उत्पादन वाढविण्यासाठी त्यांच्या आहारात प्रथिने, ऊर्जा, खनिजे आणि जीवनसत्त्वे योग्य प्रमाणात असणे आवश्यक आहे. विशेषतः चाराटंचाईच्या काळात जनावरांना पुरेसा हिरवा चारा मिळत नसल्याने प्रथिनांची कमतरता निर्माण होते. त्याचा परिणाम दूध उत्पादन आणि प्रजननक्षमतेवर होऊ शकतो. ही कमतरता भरून काढण्यासाठी बायपास प्रथिनांचा वापर करता येतो.**

» बायपास प्रथिने म्हणजे काय? : गाय आणि म्हैस यांच्या पोटात चार कप्पे असतात. त्यातील पहिल्या कप्प्याला रुमेन किंवा कोठीपोट म्हणतात. येथे सूक्ष्मजीवांच्या मदतीने खाद्याचे पचन होते. आहारातील बहुतांश प्रथिनांचे या कप्प्यात विघटन होते. त्यातून तयार होणाऱ्या अमोनियाचा वापर सूक्ष्मजीव करतात. मात्र, अतिरिक्त अमोनियाचे युरियामध्ये रूपांतर होऊन तो मूत्रावाटे बाहेर टाकला जाऊ शकतो. काही प्रथिने कोठीपोटात कमी प्रमाणात विघटित होऊन लहान आतड्यात पोहोचतात. तेथे त्यांचे पचन होऊन अमिनो आम्ले शरीराला उपलब्ध होतात. अशा प्रथिनांना बायपास प्रथिने म्हणतात. त्यांचा योग्य वापर केल्यास दूध उत्पादनासाठी आवश्यक प्रथिनांचा पुरवठा होण्यास मदत होते.

» प्रथिनांचे प्रमुख स्रोत : सरकी पेंड, सोयाबीन पेंड, शेंगदाणा पेंड आणि सूर्यफूल पेंड यांसारखे खाद्यघटक प्रथिनांचे स्रोत आहेत. मात्र, त्यातील प्रथिनांचे प्रमाण आणि पचनक्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे जनावरांच्या गरजेनुसार त्यांची निवड करावी. विशिष्ट प्रक्रिया करून खाद्यातील प्रथिनांचे कोठीपोटातील विघटन कमी करण्याचे तंत्रही वापरले जाते. अशा प्रक्रियेमुळे प्रथिनांचा अधिक भाग लहान आतड्यात पोहोचण्यास मदत होऊ शकते.

» बायपास प्रथिनांचा वापर कधी करावा? : चाराटंचाईच्या काळात निकृष्ट दर्जाचा चारा मिळाल्यास जनावरांना आवश्यक पोषणघटक पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. परिणामी, दूध उत्पादन घटू शकते. अशा वेळी संतुलित आहारासोबत बायपास प्रथिनांचा वापर उपयुक्त ठरू शकतो. दररोज सुमारे १० ते १५ लिटर दूध देणाऱ्या जनावरांसाठी सरकी पेंड किंवा सोयाबीन पेंड यांसारख्या नैसर्गिक प्रथिनयुक्त खाद्यघटकांचा विचार करता येतो. तर १५ ते २० लिटर दूध देणाऱ्या जनावरांसाठी गरजेनुसार प्रक्रिया केलेल्या बायपास प्रथिनांचा पर्याय तपासता येतो. मात्र, प्रत्यक्ष प्रमाण जनावराचे वजन, दूध उत्पादन, चाऱ्याची गुणवत्ता आणि संपूर्ण आहारातील पोषणमूल्यांवर अवलंबून असते.



» वापरताना घ्या काळजी : बायपास प्रथिने देण्यापूर्वी जनावरांच्या संपूर्ण आहाराचे मूल्यमापन करावे. प्रथिनांची गरज आधीच पूर्ण होत असल्यास अतिरिक्त पूरक खाद्यामुळे खर्च वाढू शकतो. त्यामुळे पशुवैद्यक किंवा पशुपोषण तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच त्यांचे प्रमाण ठरवावे. दुग्धव्यवसायात अधिक दूध मिळविण्यासाठी केवळ बायपास प्रथिनांवर अवलंबून राहू नये. हिरवा व सुका चारा, संतुलित पशुखाद्य, स्वच्छ पाणी आणि जनावरांचे आरोग्य यांचे योग्य व्यवस्थापन केल्यास दूध उत्पादन टिकविण्यास आणि व्यवसाय अधिक फायदेशीर करण्यास मदत होऊ शकते.

# उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे –जी. श्रीकांत

## औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातील उमेदवारांची बैठक

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)–** औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सर्व उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी उमेदवारांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, देविदास टेकाळे व उमेदवार उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना यावेळी देण्यात आल्या. निवडणूक प्रक्रियेबाबत काही तक्रारी किंवा सूचना असल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर कराव्यात, असेही श्रीकांत यांनी सांगितले.

या मतदारसंघात एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदार असून, मतदानासाठी ८४२ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सुमारे ३५० अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. उमेदवार व त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आवश्यक कागदपत्रे व अद्ययावत ओळखपत्रे सादर करावीत. ओळखपत्राशिवाय मतदान केंद्रात प्रवेश मिळणार नाही. मतदान केंद्रात भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यास मनाई आहे. मतदान प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नसून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मतदानाच्या ४८ तास आधी सर्व प्रकारचा निवडणूक प्रचार बंद करणे बंधनकारक आहे. या कालावधीत सभा, ऑनलाइन माध्यमांद्वारे प्रचार व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रचारात्मक कृती करता येणार नाहीत. प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा स्थानिक प्रशासनाची परवानगी घ्यावी. छापील प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता नमूद करावा. जात, धर्म, भाषा किंवा लिंगाच्या आधारावर मतदारांमध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या प्रचारास मनाई आहे. तसेच, मतदारांना प्रलोभने देणे, धार्मिक स्थळांवर प्रचार करणे, मतदानाची गोपनीयता भंग करणे व मतदान केंद्राजवळ प्रचार करणे प्रतिबंधित आहे. बोगस मतदानाची बाब निदर्शनास आल्यास तातडीने निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले.

# शेतकरी कर्जमुक्तीची तिसरी यादी जाहीर, साडेतीन लाख शेतकऱ्यांना लाभ



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील थकबाकीदार शेतकरी बांधवांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची तिसरी यादी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे.

या तिसऱ्या यादीमध्ये राज्यातील ३ लाख ५१ हजार १९२ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपल्या कर्जखात्याची थकबाकी तपासून तातडीने नजीकच्या 'आपले सेवा केंद्रावर' जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे आणि कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. कालावधीचा निकष: १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेली, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीककर्जे यात समाविष्ट आहेत.

कर्जमुक्तीची मर्यादा: २ लाख रुपयांपर्यंतच्या थकीत पीककर्जांसह पुनर्गठित व फेरपुनर्गठित कर्जांना या योजनेअंतर्गत संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ दिला जात आहे. व्याजमाफीचा दिलासा: १ एप्रिल २०२६ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्च पूर्णपणे माफ करण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत पोर्टलवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली होती. महाआयटीद्वारे चालवल्या जाणाऱ्या संगणकीय प्रणालीद्वारे आतापर्यंत एकूण २४.६७ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत:

## मराठी अभिनेत्री मधु कांबीकर यांचं निधन

**पुणे (प्रतिनिधी)–** मराठी मनोरंजनसृष्टीतून एक दु:खद बातमी समोर येत आहे. ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधु कांबीकर यांचं निधन झालं आहे.



वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पुण्यात त्यांचं निधन झाले असल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अभिनेत्री आजाराशी झुंज देत होते. पण अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर मराठी सिनेसृष्टीत दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# 'एसआयआर' यादीवर दावे- हरकती दाखल करण्यास मुदतवाढ, केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रामध्ये राबवण्यात येत असलेल्या मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाला अर्थात डखठ यादीला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जर नागरिकांचे प्रारूप मतदार यादीमध्ये नाव नसेल अशा नवमतदारांना आपलं नाव मतदार यादीमध्ये नोंदवण्यासाठी मुदतवाढ मिळाली आहे. जरीही दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली असली तरीही मात्र अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकाप्रमाणेच प्रसिद्ध केली जाणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या मुदतवाढीमुळे नवीन मतदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रातील मतदारांना पाठवण्यात आलेल्या नोटिसींना उत्तर देण्यासाठी आणि डखठ यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. हीच मुदत पूर्वी १२ ऑक्टोबरपर्यंत होती. निवडणूक आयोगाने दिलेल्या मुदतवाढीमुळे नवीन मतदारांना दिलासा मिळाला आहे. राज्यामध्ये १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीसाठी दावे व हरकती सादर करण्याच्या मुदतीत भारत निवडणूक आयोगाने पुन्हा वाढ केली आहे.

## Change In Name

My old name is **AYESHA NUREEN** Which now I am changing to my new name **AYESHA NUREEN SYED FAZLULLAH HUSSAINI**. Henceforth all her official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - Near tamboli hospital iqbal nagar parbhani Maharashtra 431401

## Change In Name

My old name is **GITESH DOSHI** Which now I am changing to my new name **GITESH SURESHCHANDRA DOSHI**.Henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address- S/O sureshchandra doshi 1-2-530 laxmi niwas mahaveer society shivaji nagar nanded maharashtra 431602

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा (खु.) ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ११० मधील प्लॉट नं. ४१ पूर्ण व प्लॉट नं. ४० चा पश्चिमेकडील भाग साईज लांबी – दक्षिण–उत्तर ४० फुट म्हजणे १२.१९ मी. व रूंदी पूर्व–पश्चिम ४५ फुट म्हणजे १३.७२ मी. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १८०० चौ.फुट व प्लॉट नं. ४१ चा पश्चिमेकडील भाग ज्याची रूंदी पूर्व–पश्चिम १५ फुट व लांबी दक्षिण–उत्तर ४० फुट ज्याचे एकूण क्षेत्रफळ ६०० चौ.फुट आहे. सदरील प्लॉट १) बालाजी निवृत्ती गोवंदे २) राजू निवृत्ती गोवंदे यांच्यातर्फे संघरत्न प्रभाकर खंदारे रा. ग्रीन पार्क, मालेगाव रोड नांदेड यांचेकडून वर्षा गौतम सावंत (लग्नापूर्वीचे नाव) वर्षा भास्कर गच्चे (लग्नानंतरचे नाव) रा. बोधीसत्व नगर, मालेगाव रोड नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा– पूर्वेस – प्लॉट नं. ४१ चा भाग, पश्चिमेस – २० फुटाचा रूंद रोड, दक्षिणेस – २० फुटाचा रूंद रोड व उत्तरेस – प्लॉट नं ४२ व ४३.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत **वर्षा गौतम सावंत (लग्नापूर्वीचे नाव) वर्षा भास्कर गच्चे (लग्नानंतरचे नाव)** यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**वर्षा गौतम सावंत (लग्नापूर्वीचे नाव) वर्षा भास्कर गच्चे (लग्नानंतरचे नाव) रा. बोधीसत्व नगर, मालेगाव रोड नांदेड**
**मो.नं. ९८९०५५४६१०, ७५८८५२४७११**

## जात वैधता प्रमाणपत्र हरवले

माझे तृप्ती विजायनंद खिल्लारे या नावाचे जात वैधता प्रमाणपत्र नांदेड ते पूर्णा बस प्रवासात हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.
संपर्क – मो.नं. ९५११७९६०४९

## Change In Name

My old name **Md Raofoddin Md Hafeej** which now I'm changing to new name, **Mohammad Raufoddin Abdul Hafeez**. Hence further my all correspondence will be done as per my new name hplease consider the same

Sign.by - Mohammad Raufoddin Abdul Hafeez Natkar Galli, Degloor, Tq. Degloor Dist Nanded, Maharashtra - 431717
Mob - 98904 46030

## Change In Name

My old Name is **SHAIKH SHAYAD** Which now I am Changing as New Name **SHAYAD VAHEDSAB SHAIKH** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: 6, At.Po. Wadgaon, Tq. Mukhed Wadgaon, Mukhed Nanded Mukhed Maharashtra 431715 Mo.No. 8830579222


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## // जाहिरनामा मसुदा //

अर्जदार श्री.रमेश विश्वनाथ रावलोड, रा.मु.पो.कांडली ता.भोकर जि.नांदेड यांनी गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम 2013 मधील प्रकरण 2 अन्वये प्रस्तावित स्थळ **मौ.कांडली ता.भोकर येथील गट क्र. 232** मधील **श्री.रमेश विश्वनाथ रावलोड** यांच्या स्वत:च्या मालकीचे एकूण जमीन क्षेत्र 1.39 हे. आर. पैकी 01.00 हे.आर. मधून दगड उत्खनन करीता खाणपट्टा (Quarry Lease) मिळणे बाबत विहित नमुन्यामध्ये विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

करीता सदर खाणपट्टा प्रस्तावाबाबत कुणाचीही तक्रार अथवा हितसंबंध असल्यास 15 दिवसाच्या आत जिल्हाधिकारी, कार्यालय नांदेड येथे सादर करावे. या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या तक्रार / आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

(विपीन पाटील)
जिल्हा खनिकर्म अधिकारी नांदेड

## Change In Name

My old name is **SHWETA DOSHI** Which now I am changing to my new name **SHWETA GITESH DOSHI** henceforth all her official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - W/O gitesh doshi ,1-2-530 laxmi niwas, mahaveer society, shivaji nagar, nanded maharashtra 431602

## जाहीर प्रगटण

माझे पक्षकार सुंदरलाल सवाजी अर्बन को-ऑप. बँक लि. शाखा : माजलगांव जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून कागदपत्रावरून हे जाहीर प्रगटन देत आहे कि,

हे कि, १)दिपक रमेशचंद्र कोडगिरकर २)सारिका दिपक कोडगिरकर ३) सोनी सतेंद्र अउलवार यांच्या मालकी व ताब्यातील नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका हद्दीतील मौजे अस्दुल्लाबाद/नांदेड शहर मधील सि.टी.एस क्रं.८३५३ मधील एक प्लॉट ज्याचा प्लॉट क्रं.२८ आहे ज्याची एकूण लांबी दक्षिण-उत्तर ५० फुट म्हणजेच १५.२४ मीटर आहे व रुंदी पूर्व-पश्चिम ४० फुट म्हणजेच १२.२० मीटर आहे, ज्याचे एकूण क्षेत्रफळ २००० चौ.फुट म्हणजेच १८५.८७ चौ.मी. आहे, ज्यावर ९७.३३ चौ.मीटर चे आर.सी.सी. बांधकाम आहे, ज्याची चतुसिमा खालील प्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्वेस - | १० फुट रुंद रोड आहे, | पश्चिमेस - | प्लॉट क्रं.३१ आहे, |
| दक्षिणेस - | १६ फुट रुंद आहे, | उत्तरेस - | प्लॉट क्रं.२९ आहे, |

सदर वरनमूद चतुर्सिमेच्या आतील प्लॉट १)दिपक रमेशचंद्र कोडगिरकर २)सारिका दिपक कोडगिरकर ३) सोनी सतेंद्र अउलवार यांनी भानुदास केशवराव चिटणीस यांच्या कडून नोंदणीकृत विक्रीखत क्रं. ३६११/२०२५ दि.१५/०४/२०२५ रोजी खरेदी केले आहे.

हे कि, सोनी सतेंद्र अउलवार यांच्या कडून नोंदणीकृत लिंक विक्रीखत क्रं. ३६११/२०२५ दि.१५/०४/२०२५ च्या "मूळ प्रत (Original Copy)" गहाळ झाले आहे. तशी गहाळ नोंद सोनी सतेंद्र अउलवार यांनी गहाळ नोंद क्रं.०६४६/२०२६ दि.१२/१०/२०२६ पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड जि. नांदेड यांनी घेतली असून सोनी सतेंद्र अउलवार यांना ती गहाळ नोंद देण्यात आली आहे.

हे कि, १)दिपक रमेशचंद्र कोडगिरकर २)सारिका दिपक कोडगिरकर ३) सोनी सतेंद्र अउलवार यांनी सदर वरनमूद मौजे असदुल्लाबाद, नांदेड येथील प्लॉट क्रं.२८ सि.टी.एस. ८३५३ व गट क्रं.५२/A ज्याचे एकूण क्षेत्रफळ २००० चौ.फुट बाबत सुंदरलाल सवाजी अर्बन को-ऑप. बँक लि. शाखा : माजलगांव जि. बीड यांच्याकडून "कर्ज घेवून" सदरील प्लॉट बँकेच्या हक्कात गहाण ठेवण्याचे ठरवले आहे.

म्हणून, सर्व हित सबंधित व जनतेस कळविण्यात येते कि, जर सदरील वरनमूद प्लॉट क्रं.२८ बाबत कोणाचा काही हितसंबंध, बोजा असेल त्या त्या हित संबंधी लोकांनी/बँक या जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी आक्षेप, उजर कागदपत्रासह नोंदवावा व मुदत संपल्यावर माझे पक्षकार बँक सदरील मालमत्तेवर कर्ज देऊन गहाण करून घेतील व मुदतीनंतर आलेल्या कोणतेही आक्षेपास माझे पक्षकार बँक वर बंधनकारक राहणार नाही यांची सर्व हित संबंधितांनी नोंद घ्यावी म्हणून हे जाहीर प्रगटन दि.१२/१०/२६

मार्फत : ॲड. मधुसूदन पि.लक्ष्मीनारायण शर्मा,
रा.मारवाडी गल्ली, वजिराबाद, नांदेड. मो.९५०३९३१६१७

जाहीरप्रगटण देणार
सुंदरलाल सवाजी अर्बन को-ऑप. बँक लि. शाखा : माजलगांव जि. बीड

## जाहिर प्रगटन

मला माझे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी हे जाहिर प्रगटन देत आहे की,

हे की माझे पक्षकार यांनी **श्री नितीन व्यंकटराव कळसे, रा.विष्णूनगर, नांदेड** यांच्याकडुन त्यांच्या मालकी व कब्ज्यातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या हद्दीतील मौजे विष्णूनगर नांदेड येथील सर्व्हे नं.67, सिटी सर्व्हे नं.11070 पैकी प्लॉट क्र.28, ज्याचा मालमत्ता नं.1-24-620 असा आहे, ज्यावर दोन मजली 8 रुम व संडास-बाथरुमसह आर.सी.सी बांधकाम केलेल आहे, ज्याचे एकूण क्षेत्रफळ 1050 चौ.फुट म्हणजेच 97.58 चौ.मीटर आहे. सदरील मालमत्ता विकत घेण्याचा करार केलेला आहे व करारापोटी इसारा रक्कम सुध्दा दिलेली आहे.

**सदरील प्लॉटचे वर्णन**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेडच्या हद्दीतील मौजे विष्णूनगर नांदेड येथील सर्व्हे नं.67, सिटी सर्व्हे नं.11070 पैकी प्लॉट क्र.28, ज्याचा मालमत्ता नं.1-24-620 असा आहे, ज्यावर दोन मजली 8 रुम व संडास-बाथरुमसह आर.सी.सी बांधकाम केलेल आहे, ज्याचे एकूण क्षेत्रफळ 1050 चौ.फुट म्हणजेच 97.58 चौ.मीटर असून ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पुर्वेस - | प्लॉट क्र.40 आहे. |
| पश्चिमेस - | 15 फुट रुंद रस्ता आहे. |
| दक्षिणेस - | प्लॉट क्र.29 आहे. |
| उत्तरेस - | 15 फुट रुंद रस्ता आहे. |

तरी सर्व जनतेस व संबधीतांना या जाहिर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, कोणाला सदरील व्यवहाराबदल काही आक्षेप असल्यास किंवा कोणाचा सदरील मालमत्ता / घरा मध्ये काही हक्क संबध असल्यास त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्या तारखेपासून 8 दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप संबधीत कागदपत्रासह खालील पत्यावर नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा काही आक्षेप अथवा उजर न आल्यास माझे पक्षकार सदरील व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेला आक्षेप अथवा उजर माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

करिता हे प्रगटन.

दिनांक : 12/10/2026

प्रगटन देणार
**ॲड. शामसुंदर एस.वाकोडे**
त्रिवेणीनगर, चैतन्यनगर, तरोडा (बु) रोड
नांदेड-431605
मो.नं.9011470055

## Format C-1

### Declaration about criminal cases

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

Name and address of candidate : **Ghote Sushil Sureshrao**

Name of political party : Independent

Name of Election : 05 Aurangabad Division Graduates Constituency

*Name of Constituency: **MLC 05 Aurangabad Division Graduates Constituency**

I **Ghote Sushil Sureshrao,** a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents:

(A) Pending criminal cases

| Sl. No. | Name of Court | Case No. And Dated | Status of Case(s) Trial | Section(s) of Acts concerned and Brife description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| **1.** | **Honble CJM Latur** | **R C C 1516/2020 Dated 28/12/2020** | **Pending** | **IPC 465, 468, 201, 34** |

(B) Details about cases of conviction for criminal offences

| Sl.no. | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed. | Maximum Imposed Punishment |
|---|---|---|---|
| **1.** | **Honble J.M.F.C. Aurangabad Dated. 27/06/2024** | **Section 138 of N.I. Act Accused is Directed to pay 21,13,650/- Rs to the complainant in default to suffer simple imprisonment for 5 months.** | **simple imprisonment for 2 months: in default of payment of compensation, simple imprisonment for 5 months.** |

*ADDITIONAL DETAILS REGARDING APPEAL :- An appeal against the judgment of conviction dated 27/06/2024 passed by the Judicial Magistrate First Class, Court No. 20, Aurangabad, have been filed before the Court of District Judge-2 and Additional Sessions Judge, Aurangabad, bearing Criminal Appeal No. 168/2024. The appeal is pending for hearing.

*In the case of election to Council of States or election to Legislative Council by MLAs, mention the election concerned in place of name of constituency.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## दुर्गा- शारदामय झाले नांदेड; २,५१६ दुर्गादेवी, ३७ शारदादेवींची स्थापना

◆ एसपी डॉ. निलाभ रोहन यांचे शांतता राखण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**- 'आई राजा उदो उदो'च्या अखंड जयघोषात आणि ढोल-ताशांच्या गजरात नांदेड जिल्हा रविवारपासून नवरात्रोत्सवाच्या भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. जिल्हाभरात पहिल्या माळेला एकाच दिवशी तब्बल २ हजार ५५५ ठिकाणी दुर्गादेवी, शारदादेवीच्या मूर्ती आणि घटस्थापना अत्यंत मंगलमय वातावरणात करण्यात आली.



शारदीय नवरात्रोत्सव- २०२६ संपूर्ण नांदेड जिल्ह्यात शांततेत, सुरक्षित वातावरणात आणि उत्साहात साजरा व्हावा, यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी व्यापक व चोख सुरक्षा नियोजन केले आहे. त्याचाच प्रत्यय आज पहिल्या दिवसापासूनच जिल्हाभरात पाहायला मिळाला.

घटस्थापनेच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागात झालेल्या स्थापनेचा तपशील असा आहे: दुर्गादेवी स्थापना - शहरी भागात ८३२ आणि ग्रामीण भागात १,६८४, अशी एकूण २,५१६ ठिकाणी. शारदादेवी स्थापना -शहरी भागात १० आणि ग्रामीण भागात २७, अशी एकूण ३७ ठिकाणी. घटस्थापना - २ ठिकाणी. अशा प्रकारे मिळून जिल्ह्यात एकूण २,५५५ ठिकाणी मूर्ती व घटस्थापना करण्यात आली आहे.

पहाटेपासूनच मंदिरे आणि सार्वजनिक मंडळांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. फुलांची सजावट, आकर्षक विद्युत रोषणाई आणि भव्य मंडपांमुळे शहराला उत्सवाचे स्वरूप आले आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षा आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड शहर तसेच ग्रामीण भागातील सर्व प्रमुख देवी मंदिरे, सार्वजनिक मंडळे आणि संवेदनशील भागात स्थानिक पोलीस प्रशासनातर्फे चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रत्येक मंडपावर सीसीटीव्ही, महिला सुरक्षा पथक आणि सतत गस्त ठेवण्यात आली आहे.

सर्व नागरिक, भाविकांनी आणि सार्वजनिक उत्सव मंडळांनी शांततेच्या व नियमांच्या चौकटीत राहून उत्सव साजरा करावा. मंडळांनी ध्वनीक्षेपक व देखाव्यांसंदर्भात शासकीय नियमांचे काटेकोर पालन करावे, सामाजिक सलोखा जपावा तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता उत्सव सुरक्षित व पर्यावरणपुरक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले आहे.

## सेवासंकल्प अभियानांतर्गत दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यशाळा

◆ १५ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे आयोजन ◆ सर्व व्यवस्थापनांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना संधी ◆ ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन ◆ दोन सत्रांत विविध चाचण्या व मार्गदर्शन

**नांदेड (प्रतिनिधी)**- सेवासंकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता, अभिरूची, अभिवृत्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देण्यासह त्यांना शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील योग्य संधींची ओळख करून देण्यासाठी इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), नांदेड यांच्या वतीने आयोजित या कार्यशाळेत बुद्ध्यांक मापन, अभिवृत्ती चाचणी, व्यक्तिमत्त्व चाचणी, मानसशास्त्रीय समुपदेशन आणि डिजिटल साक्षरतेविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



या कार्यशाळेसाठी नांदेड तालुक्यातील सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांमधून इयत्ता दहावीतील दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक शाळेतील प्रथम क्रमांकाचा एक विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी आणि एकल पालक असलेला एक विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी यांचा समावेश असेल.

कार्यशाळेचे पहिले सत्र सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत होणार असून, यामध्ये पूर्वपरीक्षा, बुद्ध्यांक मापन, अभिवृत्ती चाचणी, व्यक्तिमत्त्व चाचणी आणि कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे.

दुसरे सत्र दुपारी ३ ते सायंकाळी ५ या वेळेत होईल. या सत्रात विद्यार्थ्यांना मानसशास्त्रीय समुपदेशन, शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासासाठी मार्गदर्शन तसेच डिजिटल साक्षरतेविषयी माहिती देण्यात येणार आहे.

नांदेड तालुक्यातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख यांनी पात्र विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी विहित मुदतीत पूर्ण करून घ्यावी. तसेच सर्व शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख यांनीही दिलेल्या https://forms.gle/sQsUqUDm4nfErR2P या ऑनलाइन लिंकद्वारे आवश्यक माहिती भरुन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



**नांदेड** - मुखेड येथील वसंतनगर येथे आ. डॉ. तुषार राठोड व परिवाराच्या वतीने श्री साईबाबा मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहण सोहळा पार पडला. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. प्रताप पाटील चिखलीकर, आ. अमरनाथ राजूरकर, माजी आमदार सुभाष साबणे, डॉ. संतुकराव हंबर्डे आदी मान्यवर व राठोड परिवारातील सदस्य आणि भाविक उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस)**

वित्त आयोग निधी, अतिक्रमण, जलजीवन मिशनवर प्रश्नचिन्ह

## सोमेश्वर ग्रामपंचायत वादाच्या भोवऱ्यात, सीईओने दिले बीडीओला चौकशीचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)**- सोमेश्वर ग्रामपंचायतीच्या कथित अनियमित कारभाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ५ ऑक्टोबरपासून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या आमरण उपोषणाची प्रशासनाने अखेर दखल घेतली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी उप मुख्य कार्यकारी अधिकारी गिरी व अमित राठोड यांच्यामार्फत नांदेड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, केवळ आदेशावर समाधान न मानता चौकशी पूर्ण होऊन अहवाल मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय उपोषणकर्त्यांनी घेत आमरण उपोषणाचे रूपांतर आता साखळी उपोषणात केले आहे.

नांदेड शहरालगत असलेल्या सोमेश्वर ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत: - नमुना क्रमांक ८-अ मध्ये मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला. - १४ व्या व १५ व्या वित्त आयोगाचा निधी कोणत्या कामांसाठी खर्च झाला, याची माहिती नागरिकांना दिली जात नाही. - दलित वस्तीतील व गावातील मोकळ्या जागांवरील अतिक्रमणे, अण्णा भाऊ साठे समाज मंदिर दुरुस्तीचा निधी, स्वच्छ भारत अभियान, दलित वस्ती पंचवार्षिक निधी आणि रोजगार हमी योजनेंतर्गत अर्धवट कामे. - जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांचीही तपासणी करण्याची मागणी आहे.

विस्तार अधिकाऱ्यावर पक्षपाताचा आरोप - या प्रकरणात पंचायत समितीचे विस्तार अधिकारी व्ही. बी. कांबळे यांनी सवर्णांच्या दबावाखाली येऊन सोमेश्वर येथील रतनबाई सरोदे, नेमूबाई सरोदे आणि प्रकाश सरोदे यांच्या जागेची कोणतीही तक्रार नसताना व पूर्वसूचना न देता मोजणी केल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊ शकते, असा दावा करून संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## किनवट ते माहूर पदयात्रेचे आयोजन

**किनवट (प्रतिनिधी)**- मागील ५ वर्षांपासून सुरू असलेल्या किनवट ते माहूर पदयात्रा व सामूहिक उपासना उपक्रमाचे यंदाही आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ५ वाजता या पदयात्रेला प्रारंभ होणार आहे. जय श्रीराम पदयात्रा समितींच्या वतीने आयोजित या धार्मिक उपक्रमात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

किनवट येथील श्री संत गजानन महाराज मंदिरातून पदयात्रेला सुरुवात होऊन माहूर येथील श्री दत्त शिखर संस्थान येथे पदयात्रेची सांगता होणार आहे. भक्तिभाव, श्रद्धा आणि सामूहिक उपासनेच्या माध्यमातून भाविकांना धार्मिक परंपरेशी जोडणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या पदयात्रेसाठी हभप दिनेशगुरू कुलकर्णी (छत्रपती संभाजीनगर) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. पदयात्रेच्या माध्यमातून धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि सामूहिक श्रद्धेचा संदेश दिला जाणार आहे.

## वृत्तपत्र विक्रेते दौलतराव कदम यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या सिडको येथील वृत्तपत्र विक्रेता शाखेचे ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते दौलतराव शेषराव कदम यांचे दीर्घ आजाराने वयाच्या ६२ वर्षी १२ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांच्या पार्थिव देहावर सायंकाळी ५ वाजता सिडको स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सतीश कदम यांचे ते वडील होत.



## मराठी पाचवीच्या पाठ्यपुस्तक समीक्षणासाठी रुचिरा बेटकर यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)**- 'राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४'वर आधारित 'मराठी शिकू मराठी आनंदाने' या इयत्ता पाचवीच्या पाठ्यपुस्तकाच्या समीक्षण सत्रासाठी नांदेड येथील सांदीपनी इंटरनॅशनल स्कूलच्या शिक्षिका रुचिरा बेटकर यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या वतीने हे समीक्षण सत्र दि. १४ व १५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.



या पाठ्यपुस्तकाची मसुदा प्रत मंडळाच्या मराठी भाषा तज्ज्ञ समितीमार्फत तयार करण्यात आली आहे. पाठ्यपुस्तक दर्जेदार, निर्दोष आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व्हावे, या उद्देशाने शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या अनुभवी व्यक्ती आणि तज्ज्ञांकडून त्याचे समीक्षण केले जाणार आहे.

या विशेष सत्रात रुचिरा बेटकर यांना दि. १४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे. त्यांच्या मोलाच्या सूचना व अभिप्रायांचा विचार करूनच पाठ्यपुस्तकाला अंतिम स्वरूप दिले जाणार आहे. मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकाच्या निर्मिती प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण अशा समीक्षक पदाची जबाबदारी मिळाल्याबद्दल रुचिरा बेटकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## शॉर्टसर्किटमुळे तीन एकर ऊस जळून खाक; आर्थिक मदतीची मागणी

**हदगाव (प्रतिनिधी)**- हदगाव शहरालगत असलेल्या शेत सर्व्हे क्रमांक ८७, ८८ व ८९ मधील शेतकरी प्रकाश रामचंद्र राठोड यांच्या शेतातील तीन एकरांवरील ऊस शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत जळून खाक झाला. सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी घडलेल्या या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले. आग विझविण्यासाठी शेतकरी कुटुंबाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र आगीत उसाचे मोठे नुकसान झाले.



शेतातील उभ्या उसाला आगीची झळ बसल्याने तीन एकरांतील ऊस जळून खाक झाला. उसाच्या पिकासाठी केलेला खर्च आणि त्यातून मिळणाऱ्या अपेक्षित उत्पन्नावर पाणी फिरल्याने शेतकरी प्रकाश रामचंद्र राठोड यांच्यासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची माहिती असून, आग लक्षात येताच शेतकरी कुटुंबाने ती विझविण्यासाठी धडपड केली. मात्र, आगीने रौद्ररूप धारण केल्याने उसाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या मेहनतीने उभे केलेले पीक डोळ्यांदेखत जळताना पाहण्याची वेळ आल्याने कुटुंब उदिग्न झाले आहे. या घटनेची महसूल व कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन घटनास्थळाची पाहणी करावी. नुकसानीचा पंचनामा करून शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.

## सिडको-हडको परिसरासह ग्रामीण भागात सार्वजनिक दुर्गा मंडळांनी केली ढोल ताशांच्या गजरात स्थापना

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- सिडको-हडको परिसरासह ग्रामीण भागातील सार्वजनिक दुर्गा मंडळांनी रात्री उशिरापर्यंत ढोल, ताशांच्या व गरबाचा गजरात विधीवत पूजन करून नवदुर्गाची स्थापना केली. ग्रामीणचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण व शहरी भागात कडेकोट पोलीस बंदोबस्त लावण्यात आला.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील शहरी भागात ऑनलाईन परवानगी ३७ तर विना परवाना ४७ अशा एकूण ८४ मंडळांनी नोंद केली आहे. ग्रामीण भागातील ऑनलाईन २५ व विना परवाना ५५ सार्वजनिक दुर्गा मंडळांनी विनापरवाना नोंद केली असून, एकूण १६४ सार्वजनिक दुर्गा मंडळांनी नोंद केली आहे, सार्वजनिक दुर्गा महोत्सव मंडळांनी रोषणाई सजावट, कमानी व गरबा खेळण्यासाठी मैदाने खुली केली आहेत तर सिडको-हडको भागासह जुना कौठा बालाजी मंदिर येथे वार्षिक ब्रम्होत्सवाला ११ ऑक्टोबरपासून सुरूवात करण्यात आली आहे. यावेळी विधीवत पूजा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडको परिसरातील न्यू छत्रपती दुर्गा माता महोत्सव शिवाजी चौक नटराज, वैभव नवदुर्गा नवरात्र महोत्सव, नवयुवक दुर्गा महोत्सव सोनार गल्ली, माता वैष्णवी, न्यू राजस्थानी वात्सल्य नगर, शिवबा दुर्गा महोत्सव हडको, श्री जयभवानी दुर्गा महोत्सव वाघाळा यासह अनेक सार्वजनिक दुर्गा मंडळांनी आकर्षक अशा मूर्त्या नांदेड शहरातील नवीन कौठा, वसरणीसह परजिल्ह्यातील उमरखेड, लोहा तालुक्यातून ढोलताशांच्या गजरात आणल्या तर महिला भाविक भक्तांची मोठ्या संख्येने गर्दी पाहावयास मिळाली,

सिडको परिसरातील संत नरहरी महाराज सोनार गल्ली येथील नवयुवक दुर्गा माता महोत्सव यांनी जगदंब ढोल-ताशा पथकाने व आकर्षक रोषणाई करून मिरवणूक परिसरातील मुख्य मार्गावर काढली. यावेळी दुतर्फा भाविक-भक्तांनी स्वागत केले.





## सुमन दरबस्तवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**- वैलासनगर येथील रहिवासी सुमन दासराव दरबस्तवार (७४) यांचे १२ ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा १३ ऑक्टोबर रोजी राहते घर वैलासनगर येथून सकाळी ११.३० वाजता निघणार असून, त्यांच्या पार्थिवदेहावर गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, जावई, दोन मुले, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे.

## बालाप्रसाद बंदेल यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**-येथील रहिवासी व जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी बालाप्रसाद शंकरराव बंदेल यांचे आज सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई, एक भाऊ, पुतण्या, एक बहीण असा परिवार आहे. क्रीडा मार्गदर्शक अनिल बंदेल यांचे ते मोठे भाऊ होत. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. १२ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ६.३० वा. गोवर्धनघाट अंत्यसंस्कार करण्यात आले.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी आज सायबर सुरक्षा व डिजिटल साक्षरता मार्गदर्शन शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)**- डिजिटल युगात मोबाईल, इंटरनेट आणि ऑनलाइन आर्थिक व्यवहारांचा वापर झपाट्याने वाढत असताना ज्येष्ठ नागरिकांनी सायबर फसवणुकीपासून सावध राहणे आवश्यक बनले आहे. याच पार्श्वभूमीवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी 'सायबर सुरक्षा जागरूकता व डिजिटल साक्षरता' या विषयावर विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार दि. १३ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता शिवाजीनगर येथील नाना-नानी पार्क परिसरातील ज्येष्ठ नागरिक भवनाच्या सभागृहात व्याख्यान होणार आहे.

या शिबिरात ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, बनावट दूरध्वनी व संदेश, ओटीपी मागणीचे प्रकार, फसवे संकेतस्थळे तसेच विविध प्रकारच्या सायबर फसवणुकीपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. फसवणूक झाल्यास तातडीने करावयाची कायदेशीर व तांत्रिक कार्यवाही याबाबतही माहिती दिली जाणार आहे.

नांदेड शहर व परिसरातील सर्व ज्येष्ठ नागरिक संघ आणि ६० वर्षांवरील सर्व ज्येष्ठांनी या उपयुक्त कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन फेसकॉमचे उपाध्यक्ष अशोक केरकर, अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, सचिव प्रभाकर कुंटूरकर, कोषाध्यक्ष गिरीश बाराळे, ॲड. एम. झेड. सिद्दीकी, डॉ. पुरणशेट्टीवार, डॉ. पुष्पा कोकीळ, ज्येष्ठ पत्रकार माधवराव पवार काटकळंबेकर तसेच ज्येष्ठ नागरिक संघाच्या सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

## गोविंदराव गायकवाड यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)**- देगलूर तालुक्यातील दरेगाव येथील रहिवासी



गोविंदराव रामजी गायकवाड यांचे सोमवार, दिनांक १२ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी त्यांच्या मूळ गावी दरेगाव ता. देगलूर येथे दुपारी २ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, ६ मुले, नातवंडे असा परिवार आहे. स्वारातीम विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांचे ते वडील होत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com